महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन : मुंबईसह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, जालना, नाशिक

MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

www.maharashtracrimetimes.com | epaper.maharashtracrimetimes.com

मूल्य ₹ २/-

• संपादक : राकेश शंकर गोरे

• वर्ष : १७ अंक : २४ पृष्ठ : ८ मुंबई, मंगळवार १५ सप्टेंबर २०२६ ते सोमवार २१ सप्टेंबर २०२६ • POSTAL REG.NO. MCN/157/2026-2028 • PRGI. REG. NO. MAHMAR/2010/33301

### भारतीय भाषांच्या परस्पर सन्मानातूनच

# ‘एक भारत, श्रेष्ठ भारत’ साकारणार: केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

**ठाणे (तृप्ती गोरे) :** भारतीय भाषांचे संवर्धन, सन्मान आणि विकास हा केंद्र शासनाचा प्रमुख आणि दृढ संकल्प आहे. सर्व प्रादेशिक भाषा कमळाच्या विविध पाकळ्यांप्रमाणे सुंदर आणि समृद्ध असून, त्यांचा सन्मान राखत हिंदीला या भाषांमध्ये समन्वय साधणारा ‘मध्यमणी’ बनवूया, असे आवाहन केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह यांनी केले. वाशी येथील सिडको एक्झिबिशन अँड कन्व्हेंशन सेंटरमध्ये केंद्रीय गृह मंत्रालयाच्या राजभाषा विभागातर्फे आयोजित




‘हिंदी दिवस २०२६’ आणि ‘सहाव्या अखिल भारतीय राजभाषा संमेलना’च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय, खासदार नरेश म्हस्के, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, राजभाषा विभागाच्या सचिव अंशुली आर्या, व्ही.एल. कांताराव, बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांचे वंशज जॉयदीप चट्टोपाध्याय आणि मिलिंद प्रभाकर सबनीस आदी मान्यवर उपस्थित होते. राजभाषा संमेलने केवळ राजधानी दिल्लीपुरती मर्यादित न ठेवता देशातील विविध राज्यांमध्ये घेण्याचा केंद्र शासनाचा निर्णय यशस्वी ठरला असून, त्याच उपक्रमांतर्गत सहावे संमेलन महाराष्ट्रात होत असल्याचे अमित शाह यांनी सांगितले. महाराष्ट्रातील गणेशोत्सव आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाला लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी व्यापक स्वरूप देऊन देशात सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि देशभक्तीची भावना चेतवली. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वशासनासोबतच स्वधर्म आणि स्वभाषेला अग्रक्रम देत मराठीच्या विकासासाठी राजव्यवहार कोश तयार केला.

▸ पान २ वर

## डॉलरच्या वर्चस्वाला शह देण्यासाठी ब्रिक्सची नवी रणनीती

### स्थानिक चलनांतील व्यापाराला बळ

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा) :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफ आणि डॉलरच्या वाढत्या प्रभावाला शह देण्यासाठी ब्रिक्स देशांनी आर्थिक आघाडीवर विविध उपाययोजनांना चालना देण्याचा निर्धार केला आहे. नवी दिल्ली येथे झालेल्या दोन दिवसांच्या शिखर परिषदेत स्थानिक चलनांमधील व्यापार वाढविण्यासह डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. ब्रिक्सचे अध्यक्ष असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासह प्रमुख सदस्य देशांमध्ये या मुद्द्यांवर सहमती घडवून आणली. जागतिक आर्थिक निर्णय घेताना ब्रिक्सच्या भूमिकेचा विचार




करावा लागेल, असा संदेश या माध्यमातून देण्याचा प्रयत्न झाल्याचे मानले जात आहे. अमेरिकेशी संबंध कायम ठेवतानाच ब्रिक्स देशांच्या स्थानिक चलनांना बळकटी देण्याच्या दिशेने ही वाटचाल असल्याचे मानले जाते. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी डॉलरला पर्याय म्हणून स्वतंत्र पेमेंट प्रणाली विकसित करण्याची योजना मांडली. या व्यवस्थेमुळे ब्रिक्स देशांना अमेरिकेच्या स्विफ्ट प्रणाली किंवा अमेरिकन बँकांवर पूर्णपणे अवलंबून न राहता परस्परांमध्ये थेट व्यापार व्यवहार करण्याचा मार्ग उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे अमेरिकेच्या आर्थिक निर्बंधांचा व्यापारावर होणारा परिणाम कमी करण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

▸ पान २ वर

## संक्षिप्त

### ‘मुंबईचा सर्वात श्रीमंत गणपती’ ४०१ किलो दागिन्यांनी सजली मूर्ती

**मुंबई :** किंग्ज सर्कल, माटुंगा येथील जीएसबी (गौड सारस्वत ब्राह्मण) सेवा मंडळाचा महागणपती हा मुंबईतील सर्वाधिक चर्चेत असलेल्या एक आहे. यंदा मूर्तीला ६६ किलो सोने आणि ३३५ किलो चांदीच्या दागिन्यांनी सजवण्यात आले असून, मंडळाने तब्बल ७०३.२७ कोटी रुपयांचे विमा संरक्षण घेतले आहे. १९५१ पासून कार्यरत असलेल्या या मंडळातर्फे उत्सव काळात दररोज ४० हजारांहून अधिक भाविकांना प्रसाद भोजनाचे वाटप करण्यात येणार आहे. मंडळाचा भर केवळ गणेशोत्सवावर नसून अन्नदान, सामाजिक सेवा, शैक्षणिक मदत आणि गरजूंसाठी आर्थिक मदत यावरही आहे.

### वनजमिनीला ‘जैवविविधता उद्याना’चे आरक्षण नको; ठाण्यात पर्यावरणप्रेमींचे जनआंदोलन

**ठाणे :** संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील मानपाडा टिकुजीनीवाडी परिसरातील वनजमिनीला ‘जैवविविधता उद्याना’चे आरक्षण देण्यास विरोध करत पर्यावरणप्रेमींनी शनिवारी जनआंदोलन छेडले. ही जागा वनविभागाच्याच ताब्यात राहावी आणि ३, ७०० कोटी रुपयांच्या टीडीआर प्रकरणाचा सर्वोच्च न्यायालयात अंतिम निकाल लागेपर्यंत सर्व कामे स्थगित ठेवावीत, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. ‘संजय गांधी राष्ट्रीय उद्यान वाचवा’ अभियानांतर्गत हरी ओम ट्रेकर्ससह नागरिक आणि पर्यावरणप्रेमी टिकुजीनीवाडी प्रवेशद्वाराजवळ एकत्र आले होते. स्वप्नील महिंद्रकर व विजय रांजणे यांच्या पुढाकाराने झालेल्या या आंदोलनात ‘जंगल वाचवा, ठाण्याचा श्वास वाचवा’ अशा घोषणा देण्यात आल्या. ५० वर्षांहून अधिक काळ वनविभागाच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर पालिका आरक्षणाचा घाट घालत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

### एसटी महामंडळाच्या ताफ्यात लवकरच ५ हजार नव्या ‘लालपरी’ येणार; टाटा मोटर्सची निविदा मंजूर

**ठाणे :** राज्यातील प्रवाशांसाठी खूशखबर असून एसटी महामंडळाच्या ताफ्यात लवकरच ५ हजार नव्या ‘लालपरी’ बस दाखल होणार आहेत. यासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून ‘टाटा मोटर्स’ कंपनीची निविदा मंजूर करण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. पुढील सहा महिन्यांत जुन्या पाच हजारांहून अधिक गाड्या कालबाह्य होणार असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. नव्या गाड्यांमुळे प्रवासादरम्यान होणारे बिघाड आणि गळक्या गाड्यांचा त्रास कमी होईल. गाड्या उपलब्ध झाल्यावर मागणीनुसार ‘मागेल त्याला बसफेरी’ देण्याचा प्रयत्न राहील, परंतु ती फेरी तोट्यात चालणार नाही याची हमी मागणाऱ्यांनी द्यावी, असे आवाहन मंत्री सरनाईक यांनी केले. घातलेले प्लास्टिक आढळल्यास संबंधितांवर तात्काळ दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाईल. शहरातील दररोजच्या कचऱ्यात अशा प्लास्टिकचे प्रमाण मोठे असून त्यामुळे नाले तुंबणे, पाणी साचणे आणि पर्यावरण प्रदूषणाच्या समस्या वाढत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## राज्यभर भक्तिमय वातावरणात गणरायाचे आगमन

### मुंबईपासून कोकणापर्यंत उत्साहाला उधाण

**मुंबई (सम्यक कासारे) :** सर्वांचे लाडके आराध्य दैवत असलेल्या गणरायाचे आज राज्यभर मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात आगमन झाले. ‘गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया’च्या जयघोषाने शहरांपासून गावागावांपर्यंतचे वातावरण दुमदुमून गेले. मुंबईतील गल्ल्यांपासून कोकणातील छोट्या-छोट्या गावांपर्यंत बाप्पाच्या आगमनाने आनंद आणि उत्साहाला उधाण आले आहे. मुंबईत विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये सकाळपासूनच गणरायाच्या प्रतिष्ठापनेची लगबग सुरू होती. लालबागचा राजा, चिंतामणी, मुंबईचा राजा यांसह अनेक प्रसिद्ध




गणेश मंडळांमध्ये विधिवत पूजा-अर्चा करून श्रींची प्रतिष्ठापना करण्यात आली. बाप्पाच्या आगमनासाठी सजविण्यात आलेले मंडप, आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट यामुळे मुंबईचे वातावरण अधिकच उत्साहपूर्ण झाले आहे.

▸ पान २ वर

## २१ राज्यांत ‘UCC’ लागू करणार, एक-एक घुसखोर शोधून हाकलणार!

### अमित शाहांचा मुंबईतून थेट अन् कडक इशारा

**मुंबई (गणेश बागडे) :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी समान नागरी संहिता (UCC) लागू करण्याबाबत मोठी घोषणा करत २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपप्रणीत एनडीएच्या अखत्यारीतील सर्व २१ राज्यांमध्ये UCC लागू करण्याचा विश्वास व्यक्त केला. मुंबईत ‘सेवा संकल्प अभियान’च्या घोषणेप्रसंगी माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले की, अनेक राज्यांमध्ये UCC लागू करण्याची प्रक्रिया सुरू असून उत्तराखंड, गुजरात आणि आसाममध्ये ती आधीच लागू करण्यात आली आहे, तर मध्य प्रदेशमध्ये मसुदा तयार करण्यासाठी समिती कार्यरत आहे. सध्या एनडीएची



१९ राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये सत्ता असून उर्वरित राज्यांमध्येही हा कायदा लागू करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. याचवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या कार्यपूर्तीनिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान देशभर ‘सेवा संकल्प अभियान’ राबविण्यात येणार असल्याची घोषणा शाह यांनी केली.

▸ पान २ वर

## दिशा सालियान मृत्यू प्रकरणाला नवे वळण; CBI कडून FIR दाखल

**मुंबई (विशेष प्रतिनिधी) :** अभिनेता सुशांत सिंह राजपूत यांची माजी मॅनेजर दिशा सालियान यांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) औपचारिकरीत्या FIR दाखल केल्याची माहिती समोर आली आहे. FIR मध्ये हत्या आणि सामूहिक बलात्कारासह विविध गंभीर कलमांचा समावेश असल्याचे वृत्त असून, शिवसेना (UBT) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, त्यांचे पुत्र आदित्य ठाकरे यांच्यासह अनेक व्यक्तींची नावे नमूद असल्याचे सांगण्यात येत आहे. दिशा सालियान यांच्या मृत्यूला जवळपास सहा वर्षे उलटल्यानंतर या प्रकरणाच्या तपासाला आता नवे वळण मिळाले आहे. बॉम्बे हायकोर्टाने याच महिन्यात दिशा सालियान प्रकरणाचा तपास CBI कडे सोपवण्याचे निर्देश दिले होते. तसेच इतकी वर्षे FIR दाखल न करता केवळ ‘Accidental Death Report’ (ADR)च्या माध्यमातून प्रकरण हाताळल्याबद्दल मुंबई पोलिसांच्या कार्यपद्धतीवरही न्यायालयाने प्रश्न उपस्थित केले होते. न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर CBIने तपासाची औपचारिक सुरुवात करत FIR दाखल केल्याचे समोर आले आहे. समोर आलेल्या FIRच्या माहितीनुसार, दिशा सालियान यांच्या मृत्यूमागे कटकारस्थान रचणे,




त्यानंतर आत्महत्येची खोटी कहाणी तयार करणे, पुरावे दडपणे अथवा नष्ट करणे तसेच सरकारी यंत्रणेचा गैरवापर केल्याच्या आरोपांच्या अनुषंगाने तपास केला जाणार आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि इतर व्यक्तींच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणीही FIRमध्ये नमूद असल्याचे वृत्त आहे. संबंधित सरकारी कर्मचारी आणि पोलिस अधिकाऱ्यांनी कागदपत्रे किंवा सरकारी नोंदींमध्ये फेरफार केला का, पुरावे दडपले का किंवा आरोपींना वाचवण्यासाठी यंत्रणेचा गैरवापर झाला का, याचाही तपास केला जाणार असल्याचे FIRमधून दिसते. FIRमध्ये आदित्य ठाकरे, रोहन रॉय, डिनो मोरिया, सूरज पंचोली, रिया चक्रवर्ती, शोविक चक्रवर्ती, सचिन वाझे, परमबीर सिंह, अनिल देशमुख यांच्यासह अनेक पोलिस अधिकारी आणि इतर व्यक्तींची नावे नमूद असल्याचे वृत्त आहे. याशिवाय दिशा राहत असलेल्या इमारतीतील सुरक्षा कर्मचारी, काही सरकारी अधिकारी, फॉरेन्सिक प्रयोगशाळेतील संबंधित अधिकारी, पोस्टमॉर्टमशी संबंधित डॉक्टर व कर्मचारी तसेच यापूर्वीच्या तपासावर देखरेख ठेवणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही चौकशी करण्याची मागणी FIRमध्ये करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. दिशा सालियान यांचा ८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड परिसरातील एका बहुमजली इमारतीच्या १२व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला होता. त्यानंतर अवघ्या सहा दिवसांनी, १४ जून २०२० रोजी अभिनेता सुशांत सिंह राजपूत यांचा मुंबईतील निवासस्थानी मृत्यू झाला. या दोन्ही घटनांमध्ये संबंध असल्याचे दावे आणि आरोप त्यानंतर सातत्याने केले गेले.

▸ पान २ वर

## गणेशोत्सव मंडळांच्या जाहिरातींवर महापालिकेचे निर्बंध



### १०० मीटरपर्यंतच परवानगी

**मुंबई (विशाल कारंडे) :** गणेशोत्सव मंडळांना मंडपाच्या प्रवेशद्वारापासून १०० मीटर अंतरापर्यंतच व्यावसायिक जाहिराती प्रदर्शित करण्यास परवानगी देण्यात आली आहे. मात्र, १०० मीटरच्या बाहेर प्रवेशद्वारावर तसेच पदपथ आणि रस्त्यावर जाहिरात लावण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. मुंबई महानगरपालिकेने जाहिरात प्रदर्शनाबाबत निकष निश्चित केले असून, त्यांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन गणेशोत्सव मंडळांना करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या काळात मंडळांना उपलब्ध होईल त्या जागेवर जाहिरात फलक लावले जातात. त्यामुळे शहरातील अनेक रस्ते आणि पदपथ जाहिरातींनी व्यापले जातात. परिणामी शहराचे विद्रूपीकरण होत असल्याने ते कमी करण्यासाठी महापालिकेने जाहिरात प्रदर्शनाचे निकष निश्चित केले आहेत. मंडपाच्या प्रवेशद्वारापासून १०० मीटर अंतरापर्यंत व्यावसायिक जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी मंडळांना परवानगी राहणार आहे. यासाठी सरसकट १०१ रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. तर १०० मीटरच्या बाहेरील प्रवेशद्वारावर व्यावसायिक जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी एक हजार रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. गणेशोत्सव मंडळांना गुटखा आणि तंबाखूशी संबंधित उत्पादनांची तसेच मद्याच्या कोणत्याही उत्पादनाची जाहिरात करण्यास पूर्णपणे बंदी राहणार आहे. तसेच चित्रपट आणि दूरचित्रवाणी मालिकांशी संबंधित जाहिरातींमध्ये अश्लील आशयाच्या जाहिराती प्रदर्शित करण्यासही प्रतिबंध राहणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे. जाहिरात प्रदर्शित करताना पदपथावरील वाहतुकीस तसेच रस्त्यावरील वाहतुकीला कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता गणेशोत्सव मंडळांनी घ्यावी, असे महापालिकेच्या परवाना विभागाने सांगितले आहे.

▸ पान २ वर

## ‘मराठी माझी आई, अन्य भाषा माझ्या मावशी’

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे भाषाशिक्षणाचे आवाहन

**नवी मुंबई (धनश्री सट्टा) :** “माझी मातृभाषा म्हणजेच आई मराठी भाषा आहे, तर अन्य भाषा माझ्या मावशी आहेत. इतर भाषांचा सन्मान केला नाही, तर आपल्या भाषेचा सन्मानही कोणी करणार नाही. मातृभाषेबरोबर किमान एक तरी अन्य भाषा आपल्याला बोलता आली पाहिजे. हिंदीसोबत अन्य भारतीय भाषाही शिकल्या पाहिजेत,” असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. नवी मुंबई येथे दि. १४ सप्टेंबर आयोजित सहाव्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनात ते बोलत होते. हिंदी ही जगातील सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे सांगत, हिंदी भाषा आणि साहित्याला




आणखी उंचीवर नेण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे फडणवीस यांनी नमूद केले. त्याचबरोबर देशातील सर्व भाषांचा सन्मान राखला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

▸ पान २ वर

संपादकीय

संपादक : राकेश शंकर गोरे

# रेल्वेच्या नव्या मार्गिकांतून महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला वेग

भारतीय रेल्वेच्या अतिव्यस्त मार्गांवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी केंद्र सरकारने मोठ्या क्षमतावाढीचा कार्यक्रम हाती घेतला आहे. देशातील सात महत्त्वाच्या 'हाय डेन्सिटी नेटवर्क' मार्गांचे टप्प्याटप्प्याने चौपदरीकरण करण्याची योजना आखण्यात आली आहे. दिल्ली-हावडा, मुंबई-हावडा, दिल्ली-मुंबई, दिल्ली-गुवाहाटी, दिल्ली-चेन्नई, हावडा-चेन्नई आणि मुंबई-चेन्नई या मार्गांचा त्यात समावेश आहे. सुमारे ११ हजार किलोमीटरचे हे मार्ग देशातील जवळपास ४० टक्के रेल्वे वाहतूक हाताळतात. त्यामुळे या मार्गांची क्षमता वाढणे हा केवळ रेल्वे विकासाचा विषय नसून देशाच्या अर्थव्यवस्थेच्या गतीशी जोडलेला निर्णय आहे. या मार्गांपैकी सुमारे दोन हजार किलोमीटरचे चौपदरीकरण पूर्ण झाले आहे, तर जवळपास पाच हजार किलोमीटरच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. उर्वरित मार्गांसाठी प्रक्रिया सुरू आहे. दक्षिण भारतातील पाच मल्टिट्रॅकिंग प्रकल्पांसाठी १० हजार २१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने या संपूर्ण उपक्रमाला विशेष महत्त्व आहे. मुंबई-हावडा आणि मुंबई-चेन्नई हे प्रमुख मार्ग महाराष्ट्रातून जातात. दिल्ली-चेन्नई मार्गावर नागपूर-बल्लारशाहसारखी महत्त्वाची केंद्रे येतात, तर दिल्ली-मुंबई मार्ग मुंबईला उत्तर आणि पश्चिम भारतातील औद्योगिक पट्ट्यांशी जोडतो. सध्या एकाच मार्गावर मेल-एक्स्प्रेस, लांब पल्ल्याच्या प्रवासी गाड्या आणि मालगाड्या धावत असतात. मुंबई परिसरात त्यात उपनगरी रेल्वेचीही मोठी भर पडते. वेगवेगळ्या गतीने धावणाऱ्या गाड्यांमुळे रेल्वे वाहतुकीचे वेळापत्रक सांभाळणे अवघड होते. वेगवान प्रवासी गाडीला मार्ग देण्यासाठी मालगाडी थांबवावी लागते. एखाद्या गाडीला विलंब झाला की त्याचा परिणाम पुढील अनेक गाड्यांवर होतो. त्यामुळे तिसरी आणि चौथी मार्गिका ही आता सुविधा नसून वाढत्या वाहतुकीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा बनली आहे. महाराष्ट्रातील भुसावळ आणि नागपूर या दोन्ही शहरांना या विस्ताराचा मोठा फायदा होऊ शकतो. मुंबई-हावडा मार्ग कल्याण, भुसावळ आणि नागपूरमार्गे मध्य व पूर्व भारताशी जोडला जातो. भुसावळ हे उत्तर महाराष्ट्रातील रेल्वे वाहतुकीचे महत्त्वाचे केंद्र आहे. या भागातून देशाच्या उत्तर, मध्य आणि पूर्वेकडील विविध प्रदेशांशी रेल्वे संपर्क साधला जातो. नागपूरचे भौगोलिक स्थान तर आणखी महत्त्वाचे आहे. दिल्ली-चेन्नई आणि मुंबई-हावडा अशा दोन महत्त्वाच्या राष्ट्रीय मार्गांवर नागपूर येते. त्यामुळे रेल्वे क्षमतावाढीचा थेट फायदा विदर्भातील उद्योग, कृषी आणि मालवाहतुकीला होऊ शकतो. नागपूरला देशातील प्रमुख लॉजिस्टिक्स हब म्हणून विकसित करण्याची चर्चा गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. देशाच्या मध्यभागी असणे हा त्याचा मोठा भौगोलिक फायदा आहे. मात्र, लॉजिस्टिक्स केंद्राचे खरे अर्थकारण केवळ भौगोलिक स्थानावर ठरत नाही. माल किती वेगाने पोहोचतो, तो पुढील वाहतुकीच्या साधनावर किती लवकर चढविला जातो आणि निर्धारित वेळेत ग्राहकापर्यंत पोहोचतो का, यावर त्याची कार्यक्षमता ठरते. रेल्वे मार्गांची क्षमता वाढल्यास विदर्भातील खनिज, कृषी उत्पादन आणि औद्योगिक मालाला राष्ट्रीय बाजारपेठांपर्यंत पोहोचण्याचा अधिक सक्षम मार्ग मिळू शकतो. मुंबई-चेन्नई मार्गाच्या दृष्टीने पुण्याचे महत्त्व अधोरेखित होते. पुणे परिसरात वाहननिर्मिती, अभियांत्रिकी, औद्योगिक उत्पादन आणि विविध लघु-मध्यम उद्योगांची मोठी साखळी आहे. दक्षिण भारतातील बाजारपेठांशी जोडणी वाढविताना रेल्वेचा सक्षम पर्याय उद्योगांसाठी महत्त्वाचा ठरू शकतो. पुणे-सोलापूरमार्गे दक्षिणेकडे जाणाऱ्या रेल्वे वाहतुकीची क्षमता वाढल्यास मोठ्या प्रमाणातील मालाची वाहतूक अधिक किफायतशीर आणि नियमित पद्धतीने करता येऊ शकते. वाहतूक खर्च कमी झाला तर उद्योगांची स्पर्धात्मकता वाढण्यास मदत होईल. या संपूर्ण समीकरणात बंदरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. जवाहरलाल नेहरू बंदर हे देशातील प्रमुख कंटेनर बंदरांपैकी एक आहे. दादरी ते जवाहरलाल नेहरू बंदर या पश्चिम समर्पित मालवाहतूक मार्गाची क्षमता वाढल्याने उत्तर भारतातील माल थेट पश्चिम किनाऱ्यावरील बंदराशी जोडला जात आहे. लुधियाना-सोननगर या पूर्व समर्पित मालवाहतूक मार्गासह देशातील समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरचे जाळे सुमारे दोन हजार ८४३ किलोमीटरपर्यंत पोहोचले आहे. मालगाड्यांसाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध झाल्याने प्रवासी मार्गांवरील ताण कमी होतो. अतिव्यस्त मार्गांवर अतिरिक्त रेल्वेमार्गिका आणि समर्पित मालवाहतूक मार्ग या दोन्हींचा एकत्रित विकास झाला तर त्याचा आर्थिक परिणाम अधिक व्यापक होऊ शकतो. उद्योगांसाठी केवळ वाहतुकीचा वेग महत्त्वाचा नसतो, तर माल नेमक्या वेळेत पोहोचणे अधिक महत्त्वाचे असते. वाहतुकीत अनिश्चितता असेल तर कंपन्यांना अतिरिक्त साठा ठेवावा लागतो. त्यातून गोदामाचा खर्च वाढतो आणि खेळत्या भांडवलावर ताण येतो. रेल्वे वाहतूक अधिक विश्वासार्ह झाल्यास हा खर्च कमी करण्यास मदत होऊ शकते. भारतीय रेल्वेच्या मालवाहतुकीतही सातत्याने वाढ होत आहे. २०१४-१५ मध्ये रेल्वेने सुमारे एक हजार ९८ दशलक्ष टन मालाची वाहतूक केली होती. २०२१-२२ मध्ये हा आकडा एक हजार ४१८ दशलक्ष टन, २०२३-२४ मध्ये एक हजार ५९१ दशलक्ष टन, तर २०२५-२६ मध्ये एक हजार ६७० दशलक्ष टनांपर्यंत पोहोचला.

## पान १ वरून...

### भारतीय भाषांच्या परस्पर सन्मानातूनच...

तसेच ऋषी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी 'आनंदमठ'मध्ये रचलेले 'वंदे मातरम्' हे स्वातंत्र्यलढ्याची राष्ट्रीय उद्घोषणा ठरले, असे त्यांनी नमूद केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शासकीय समारंभांमध्ये 'वंदे मातरम्' पूर्ण स्वरूपात सादर करण्याची परंपरा पुन्हा सुरू केली असून, मराठीला अभिजात भाषेचा बहुमान देऊन महाराष्ट्राच्या ऐतिहासिक अस्मितेचा गौरव केला आहे, असे शाह म्हणाले. मातृभाषा ही मानवी विचारप्रक्रियेचा मूळ पाया असून ती व्यक्तीला स्वतःच्या संस्कृती, परंपरा आणि मूल्यांशी जोडून ठेवते. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षणावर भर देण्यात आला आहे. देशाशी नाते अधिक दृढ करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक अन्य भारतीय भाषा शिकली पाहिजे, असे शाह यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राजभाषा विभागाने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर सुरू केला आहे. भारत सरकारच्या पाच लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांना हिंदीचे प्रशिक्षण देण्यात आले असून, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'कंठस्थ २.०' प्रणाली पाच कोटींपेक्षा अधिक वाक्यांसह उपलब्ध करण्यात आली आहे. 'लीला राजभाषा' आणि 'लीला प्रवाह'च्या माध्यमातून भाषा शिक्षणाला गती मिळाली आहे. सुरुवातीला ५१ हजार शब्द असलेला 'हिंदी शब्दसिंधू' शब्दकोश आता आठ लाख शब्दांपर्यंत विस्तारला असून २०२९ पर्यंत तो जगातील सर्वांत मोठा शब्दकोश बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी, मराठीसह सर्व भारतीय भाषांचा परस्पर आदर करण्याचा संकल्प करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, "माझी आई मराठी आहे, मात्र देशातील इतर सर्व भाषा माझ्या मावशीसारख्या आहेत. आईचा गौरव करतानाच मावशीचाही पूर्ण सन्मान राखला पाहिजे." मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने विद्यार्थ्यांची आकलनक्षमता आणि शिक्षणाची गुणवत्ता उंचावते. भारतीय भाषांचे ज्ञान वाढवूनच 'एक भारत, श्रेष्ठ भारत' ही संकल्पना खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात येईल, असे फडणवीस यांनी सांगितले. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या सर्वोच्च जागतिक व्यासपीठावर हिंदीतून भाषण करून देशाचा सन्मान वाढवला होता, याची आठवण त्यांनी करून दिली. जगातील अनेक प्रगत देश आपापल्या मातृभाषांचा स्वाभिमानाने वापर करतात. त्यामुळे भारतानेही समृद्ध भाषांचा दैनंदिन आणि प्रशासकीय कामकाजात अधिकाधिक वापर केला पाहिजे, असे ते म्हणाले. हिंदी ही जगातील सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांपैकी तिसऱ्या क्रमांकाची भाषा आहे. मुंशी प्रेमचंद यांनी हिंदीला लोकभाषेचे व्यापक रूप देण्यात मोलाचे योगदान दिले. 'गोदान'सारख्या साहित्यकृतींनी सामान्य माणसाच्या वेदना आणि संघर्ष मांडले, तर रामधारी सिंह दिनकर आणि दुष्यंत कुमार यांच्या लेखणीने हिंदी साहित्याला वैचारिक उंची दिली. स्वातंत्र्यलढ्यात हिंदीने देशाला जोडणाऱ्या महत्त्वाच्या संपर्कभाषेचे कार्य केले, असेही फडणवीस यांनी नमूद केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिंदी ही सर्व भारतीय भाषांची सखी असल्याचे सांगितले. महाराष्ट्रात या संमेलनाचे आयोजन होणे हा मराठी भाषेचाही मोठा गौरव आहे. मराठी आणि हिंदी या देवनागरी लिपीत लिहिल्या जाणाऱ्या सख्ख्या भगिनी भाषा आहेत. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि संत नामदेव महाराज यांच्या विचारांनी संपूर्ण देशाला दिशा दिली असून, संत नामदेवांच्या रचना गुरु ग्रंथसाहिबमध्ये सन्मानाने समाविष्ट आहेत, असे शिंदे म्हणाले. २०१४ पूर्वीच्या तुलनेत केंद्र सरकारच्या कामकाजात हिंदीचा वापर लक्षणीय वाढला असून, तो केवळ संवादापुरता न राहता विज्ञान, तंत्रज्ञान, पोलीस, कायदा आणि न्यायव्यवस्थेतही वेगाने वाढला पाहिजे. महाराष्ट्रात स्थायिक झालेल्या हिंदी भाषिक नागरिकांनी मराठीचा आदर करत राज्याच्या सर्वांगीण विकासात मोलाचा हातभार लावला आहे, असेही त्यांनी नमूद केले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी गणेश चतुर्थीच्या पावन मुहूर्तावर हिंदी दिवस साजरा होणे हा शुभ योग असल्याचे सांगितले. गणेशोत्सव समाजातील विघ्ने दूर करून एकात्मता साधणारा उत्सव आहे. भारतात भाषा अनेक असल्या तरी भारतीयांची राष्ट्रीय भावना एकच आहे. प्रशासन, शिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानात भारतीय भाषांचा वापर वाढवण्याची गरज असून, मराठी आणि हिंदी साहित्यात परस्पर अनुवादाची समृद्ध देवाणघेवाण झाली आहे, असे त्यांनी सांगितले. मुंबई आणि नवी मुंबईसारख्या शहरांमध्ये विविध भाषिक समाज गुण्यागोविंदाने राहत असून, हीच 'एक भारत, श्रेष्ठ भारत'ची खरी ओळख आहे. शासनाची भाषा क्लिष्ट न राहता सर्वसामान्यांना सहज समजेल अशी सोपी असावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. या सोहळ्यात अमित शाह यांच्या हस्ते 'राजभाषा भारती'च्या 'वंदे मातरम्' विशेषांकासह 'शिव अनादि, शिव अनंत', 'भारतीय ज्ञानतंत्र: स्रोत आणि स्वरूप', 'अंधेरों से उजालों तक' आणि 'वंदे मातरम् के १५० अध्याय' या ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. संरक्षण संशोधन व विकास संघटनेच्या 'नवान्वेष: भारतीय ज्ञान परंपरा' या पुस्तकाचेही विमोचन झाले. सी-डॅकने विकसित केलेले 'भारतीय बहुभाषिक अनुवाद सारथी' हे मोबाईल ॲप आणि 'भाषाकुंज' या स्वदेशी भाषा डेटा सेंटरचे लोकार्पण करण्यात आले. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत सामान्य नागरिकांसाठी हिंदी शब्दकोश संसाधन, हिंदी टंकलेखन आणि हिंदी आशुलिपी प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला. वर्ष २०२५-२६ चे 'राजभाषा कीर्ती पुरस्कार' विविध केंद्रीय मंत्रालये, शासकीय विभाग, बँका आणि सार्वजनिक उपक्रमांना त्यांच्या उत्कृष्ट भाषाविषयक योगदानाबद्दल प्रदान करण्यात आले. या सोहळ्यास वनमंत्री गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे तसेच देशभरातून आलेले साहित्यिक, भाषातज्ज्ञ, प्रशासकीय अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉलरच्या वर्चस्वाला शह देण्यासाठी...

आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकन डॉलरऐवजी रुपया, युआन, रुबल, दिरहाम यांसारख्या स्थानिक चलनांचा वापर वाढविण्यावर ब्रिक्स देशांनी भर दिला आहे. भारत आणि चीनसह इराण आणि संयुक्त अरब अमिरातीसारख्या ऊर्जा पुरवठादार देशांमधील व्यापार स्थानिक चलनांमध्ये करण्याच्या प्रक्रियेला गती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ब्रिक्सकडून तत्काळ कोणतेही स्वतंत्र सामायिक चलन बाजारात आणण्यात आलेले नाही. मात्र, डिजिटल चलनांच्या माध्यमातून सामायिक वित्तीय चौकट उभारण्याच्या दिशेने काम सुरू आहे. या माध्यमातून डॉलरवरील अवलंबित्व कमी करून आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठी पर्यायी आर्थिक व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न आहे. परिषदेनंतर जारी करण्यात आलेल्या 'नवी दिल्ली जाहीरनाम्या'त एकतर्फी आर्थिक निर्बंध आणि व्यापार अडथळ्यांवर ब्रिक्स देशांनी आक्षेप नोंदवला. अशा निर्बंधांमुळे जागतिक व्यापार व्यवस्थेवर परिणाम होतो आणि जागतिक व्यापार संघटनेच्या (डब्ल्यूटीओ) तत्त्वांचे उल्लंघन होते, अशी भूमिका ब्रिक्स देशांनी मांडली. दरम्यान, ब्रिक्स शिखर परिषदेच्या डिनरमध्ये मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी भारतीय संगीतावरील प्रेम व्यक्त केले. त्यांनी बॉलिवूडचे दिग्गज गायक किशोर कुमार यांचे 'ख्वाब हो तुम या कोई हकीकत.' तसेच मुकेश यांचे 'दोस्त दोस्त ना रहा.' ही लोकप्रिय गीते गुणगुणली. अन्वर इब्राहिम यांच्या या अनपेक्षित गायनाने डिनरमध्ये उपस्थितांची मने जिंकली. या क्षणाचा सुमारे दीड मिनिटांचा व्हिडीओ त्यांनी त्यांच्या अधिकृत 'एक्स' अकाऊंटवर शेअर केला. व्हिडीओसोबत त्यांनी, 'गुरू, थोड़ा सा गाने की इजाजत है? ' असा मजकूर लिहिला. त्यांच्या या दिलखुलास अंदाजाचे सोशल मीडियावर कौतुक होत आहे.

### राज्यभर भक्तिमय वातावरणात गणरायाचे...

ढोल-ताशांचा गजर, लेझीम आणि गणरायाच्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला आहे. पुण्यातही गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. मानाचा आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या दगडूशेठ गणपतीची मयूर रथातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांचा गजर आणि हजारो भाविकांच्या उपस्थितीत ही मिरवणूक पार पडली. त्यानंतर विधिवत पूजा करून गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली. दरम्यान, कोकणात गणेशोत्सवाला विशेष महत्त्व असल्याने घराघरांत बाप्पाच्या आगमनाची लगबग पाहायला मिळत आहे. कोकणातील परंपरा, संस्कृती आणि श्रद्धेचे दर्शन घडविणारा हा सर्वांत मोठा सण मानला जातो. त्यामुळे कोकणवासीय आपल्या लाडक्या बाप्पाच्या स्वागतासाठी मोठ्या उत्साहाने सज्ज झाले आहेत. कोकणातील काही भागांत आजही पारंपरिक पद्धतीने बाप्पाला डोक्यावर घेऊन वाजत-गाजत घरी आणण्याची प्रथा जपली जाते. हिरव्यागार शेतांच्या बांधावरून, निसर्गाच्या सान्निध्यातून बाप्पाला डोक्यावर घेऊन जाणारे भाविक आणि त्यांच्यासोबत असलेला ढोल-ताशांचा गजर हे दृश्य मन मोहून टाकणारे ठरते. भक्ती, परंपरा आणि संस्कृतीच्या संगमातून राज्यभर गणेशोत्सवाला सुरुवात झाली असून, पुढील दिवसांत बाप्पाच्या भक्तीत संपूर्ण महाराष्ट्र रंगून जाणार आहे.

### दिशा सालियान मृत्यू प्रकरणाला...

मात्र, या दाव्यांची सत्यता तपासातूनच स्पष्ट होणे अपेक्षित आहे. सुशांत सिंह राजपूत यांच्या मृत्यू प्रकरणाचा तपासही CBIकडे सोपवण्यात आला होता. CBIने आत्महत्येच्या दिशेने तपास करून क्लोजर रिपोर्ट दाखल केल्याचे वृत्त आहे. मात्र, या अहवालावरील न्यायालयीन प्रक्रिया अद्याप सुरू आहे. दिशा सालियान प्रकरणात CBIने FIR दाखल केल्याने कटकारस्थान, पुरावे आणि संबंधित व्यक्तींच्या भूमिकेचा नव्याने तपास होण्याची शक्यता आहे. मात्र, FIR मध्ये एखाद्या व्यक्तीचे नाव असणे म्हणजे त्या व्यक्तीविरुद्धचे आरोप सिद्ध झाले आहेत, असा अर्थ होत नाही. अंतिम निष्कर्ष तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होणार आहेत.

### २१ राज्यांत 'UCC' लागू...

या अभियानात एनडीएतील सर्व घटक पक्ष आणि विविध स्वयंसेवी संस्था सहभागी होणार असून प्रत्येक राज्य, केंद्रशासित प्रदेश आणि प्रशासकीय स्तरावर विविध सेवा उपक्रम आयोजित केले जाणार आहेत. अमित शाह यांनी यावेळी देशातील बेकायदेशीर घुसखोरीविरोधात कठोर भूमिका कायम ठेवण्याचा पुनरुच्चार केला. प्रत्येक बेकायदेशीर घुसखोराची ओळख पटवून त्याला देशाबाहेर पाठवले जाईल, असे त्यांनी सांगितले. केंद्र सरकारच्या कामगिरीचा उल्लेख करताना त्यांनी अयोध्येतील राम मंदिर उभारणी, कलम ३७० रद्द करणे, तिहेरी तलाक कायदा रद्द करणे आणि नक्षलवादाविरोधातील कारवाई यांचा उल्लेख केला. २०१४ पूर्वी देशाच्या राजकारणावर भ्रष्टाचार, जातीयवाद आणि घराणेशाहीचे वर्चस्व होते, मात्र गेल्या १२ वर्षांत कामगिरीवर आधारित राजकारणाला चालना मिळाल्याचा दावा त्यांनी केला. भारताच्या संरक्षण आणि परराष्ट्र धोरणाचा आधार 'इंडिया फर्स्ट' असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलनाच्या प्रश्नावर प्रतिक्रिया देताना शाह यांनी लोकशाहीत मतभिन्नता स्वाभाविक असल्याचे सांगत काँग्रेसवर टीका केली. भाजप संवाद आणि चर्चेवर विश्वास ठेवतो, आणीबाणी लादून कारभार करणे ही काँग्रेसची संस्कृती आहे, आमची नाही, असेही त्यांनी म्हटले.

### गणेशोत्सव मंडळांच्या जाहिरातींवर...

वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या जाहिरातींवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. महापालिकेचे डिजिटल माध्यमातून जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी १०० चौरस फूट क्षेत्रफळापर्यंत जाहिरात प्रसिद्ध करण्यास परवानगी राहणार आहे. मात्र, त्यासाठी वाहतूक पोलिस आणि स्थानिक पोलिसांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच जाहिरातीमध्ये सामाजिक आणि नागरिक संदेश देणेही बंधनकारक राहणार आहे. गणेशोत्सवाच्या कालावधीपुरतीच जाहिरातींना परवानगी राहणार आहे. गणेश विसर्जनाच्या दुसऱ्या दिवशी जाहिराती काढून टाकणे मंडळांना बंधनकारक करण्यात आले आहे. जाहिराती काढण्यात आल्या नाहीत, तर त्या मुंबई महानगरपालिकेतर्फे काढण्यात याव्यात, असे निर्देश महापालिका आयुक्तांनी सहाय्यक आयुक्तांना दिले आहेत.

### 'मराठी माझी आई, अन्य...

इंग्रजीसोबत हिंदीलाही राजभाषेचा दर्जा मिळाला असून, देशाच्या कामकाजात हिंदीचा वापर वाढला आहे. मातृभाषा आणि राजभाषेचा आग्रह पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कायम ठेवला असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मातृभाषेसोबत राजभाषा आणि अन्य भारतीय भाषा शिकल्यास व्यक्तीच्या प्रगतीच्या अधिक संधी निर्माण होतील, असेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे मातृभाषेच्या जोडीने अन्य भारतीय भाषांचे ज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी केले. सहावे अखिल भारतीय राजभाषा संमेलन नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनासाठी महाराष्ट्राची निवड केल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे आभार मानले. देशाच्या कामकाजात इंग्रजीसोबत हिंदीचाही वापर व्हावा आणि हिंदीला राजभाषेचे स्थान मिळावे, या विचारातून राजभाषा धोरणाला चालना मिळाल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी नमूद केले.

# महाराष्ट्रातील आत्महत्यांचे वाढते प्रमाण चिंताजनक



आत्महत्या ही केवळ एखाद्या व्यक्तीच्या जीवनाशी संबंधित घटना नसून ती कुटुंब, समाज आणि संपूर्ण व्यवस्थेसमोर उभे राहिलेले गंभीर आव्हान आहे. महाराष्ट्रात आत्महत्यांचे वाढते प्रमाण चिंतेचा विषय बनले आहे. विशेषतः तरुण विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये वाढणारी मानसिक अस्वस्थता समाजाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे. वृत्तपत्रातील आकडेवारीही या समस्येचे गांभीर्य अधोरेखित करते. त्यामुळे आत्महत्यांकडे केवळ आकडे म्हणून न पाहता त्यामागील सामाजिक, आर्थिक आणि मानसिक कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात आर्थिक अडचणी, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा, कौटुंबिक समस्या, नातेसंबंधांतील ताण, शैक्षणिक दबाव, भविष्यातील अनिश्चितता आणि एकटेपणा यामुळे अनेकांना मानसिक तणावाचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागात शेतीशी संबंधित अडचणी आणि आर्थिक अस्थिरता तर शहरी भागात स्पर्धात्मक जीवनशैली व वाढता मानसिक ताण ही चिंतेची कारणे आहेत.विद्यार्थ्यांमध्ये वाढणारा ताण विशेष चिंताजनक आहे. परीक्षेतील गुण, पालकांच्या अपेक्षा, प्रवेशाची स्पर्धा, करिअरची चिंता आणि मित्रांशी होणारी तुलना यामुळे काही विद्यार्थ्यांवर अनावश्यक मानसिक दबाव निर्माण होतो. मुलांनी प्रत्येक क्षेत्रात अव्वल असलेच पाहिजे, असा आग्रह पालकांनी धरू नये. अपयश हा जीवनाचा शेवट नसून शिकण्याची आणि पुन्हा प्रयत्न करण्याची संधी आहे, हा सकारात्मक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे गरजेचे आहे.ज्येष्ठ नागरिकांच्या मानसिक आरोग्याकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. बदलती कुटुंबव्यवस्था, मुलांचे स्थलांतर, एकटेपणा, आरोग्याच्या समस्या आणि सामाजिक संपर्क कमी होणे यामुळे त्यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ शकते. कुटुंबातील सदस्यांनी ज्येष्ठांशी नियमित संवाद साधणे, त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे आणि त्यांच्या भावनांना महत्त्व देणे आवश्यक आहे. आत्महत्या रोखण्यासाठी मानसिक आरोग्याविषयी खुलेपणाने बोलण्याची संस्कृती निर्माण झाली पाहिजे. मानसिक तणाव म्हणजे कमजोरी नसून तोही आरोग्याशी संबंधित प्रश्न आहे, हे समाजाने स्वीकारले पाहिजे.शाळा-महाविद्यालयांमध्ये समुपदेशकांची उपलब्धता वाढवावी. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या वर्तनातील बदलांकडे संवेदनशीलतेने पाहावे. पालकांनी केवळ अभ्यास आणि गुणांबाबत विचारपूस न करता मुलांच्या भावनिक स्थितीबद्दलही संवाद साधावा.सोशल मीडियामुळेही तरुणांमध्ये स्वतःची इतरांशी तुलना करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. इतरांचे यश, आर्थिक स्थिती किंवा जीवनशैली पाहून स्वतःला कमी लेखण्याची भावना निर्माण होऊ शकते. त्यामुळे सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर आणि प्रत्यक्ष माणसांशी संवाद यांचे महत्त्व समजावून सांगणे गरजेचे आहे. कुटुंबातील संवाद हा या समस्येवरचा सर्वांत महत्त्वाचा आधार ठरू शकतो. एखादी व्यक्ती सतत निराश दिसत असेल, एकटी राहण्याचा प्रयत्न करत असेल किंवा जीवनाबद्दल अत्यंत नकारात्मक बोलत असेल, तर तिची थट्टा किंवा टीका करण्याऐवजी तिचे म्हणणे शांतपणे ऐकले पाहिजे. गरज भासल्यास विश्वासू व्यक्ती, समुपदेशक किंवा मानसिक आरोग्यतज्ज्ञांची मदत घेण्यासाठी तिला प्रोत्साहित केले पाहिजे.सरकारने मानसिक आरोग्य सेवा अधिक सुलभ आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्याबरोबरच ग्रामीण भागातही समुपदेशनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे. शेतकरी, विद्यार्थी, कामगार, महिला आणि ज्येष्ठ नागरिक अशा विविध घटकांसाठी स्थानिक पातळीवर मदतव्यवस्था मजबूत झाली पाहिजे. माध्यमांनीही आत्महत्यांच्या बातम्यांचे वार्तांकन करताना संवेदनशीलता आणि जबाबदारी पाळणे आवश्यक आहे.आत्महत्या रोखणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही; ती कुटुंब, शैक्षणिक संस्था, समाज आणि प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आकडेवारी कमी करण्याबरोबरच त्यामागची कारणे कमी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. माणसांमधील संवाद, आपलेपणा आणि आधार वाढला तर अनेक संकटांना सामोरे जाण्याची ताकद निर्माण होऊ शकते. कोणत्याही व्यक्तीला तिच्या अडचणींमध्ये एकटे पडू न देणे, हाच आत्महत्या प्रतिबंधाचा खरा सामाजिक मार्ग आहे.

**श्याम ठाणेदार**


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**दक्षिण मुंबई (विद्युत) सा.बां.विभाग, मुंबई**
**बांधकाम भवन, १ ला मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-०१.**

**मेल पत्ता :-** elsouthmumbai.ee@mahapwd.gov.in **दूरध्वनी क्रमांक-०२२-२२००८४४८**

**ई निविदा सुचना क्र. २१ सन** २०२६-२७

कार्यकारी अभियंता दक्षिण मुंबई (विद्युत) विभाग, सा.बां.विभाग, मुंबई फोर्ट, मुंबई, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून विद्युत अनुज्ञापतीधाकर कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता प्रारुप बी-२ नमून्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कादपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांना राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारण्यात येणार नाही.

**कामाचे नांव :-** अंदाजपत्रक क्र. एसआर/मंत्रालय/एमएस/८३४५/२०२५-२६ एअर इंडिया इमारत, नरिमन पॉइंट, मुंबई येथे विद्युत प्रतिष्ठापन (E.I.), लॅन (LAN) नेटवर्किंग, वातानुकूलन प्रणाली, लिफ्ट्स, अग्निसूचक यंत्रणा, अग्निशमन प्रणाली आणि ऑडिओ-व्हिडिओ प्रणाली यांच्या नूतनीकरणाची, तसेच त्यांत वाढ व फेरबदल करण्याची कामे.

**अंदाजित किंमत रुपये :** ७१७१९६६६२/- (एकाहत्तर कोटी एकाहत्तर लक्ष शहान्नव हजार सहाशे बासष्ठ)

**ई- निविदा पुर्व बैठक वेळ व ठिकाण:-** दिनांक २२.०९.२०२६ रोजी दुपारी १५ : ०० वाजता मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, चौथा मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई.

**ई-निविदा उपलब्ध कालावधी** : दिनांक ११.०९.२०२६ दुपारनंतर १७:०० पासून ते दिनांक २६.०९.२०२६ रोजी १७:०० वाजेपर्यंत

**ई-निविदा उघडणे व ठिकाण** : दिनांक २८.०९.२०२६ रोजी दुपारनंतर १७:०० वाजता अधीक्षक अभियंता (वि), मुंबई प्रादेशिक विदयुत मंडळ, सा.बां. विभाग मुंबई.

सविस्तर माहिती खालील प्रमाणे उपलब्ध आहे.

२. https://mahatenders.gov.in
**(सदर निविदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)**

३. कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई (विद्युत) विभाग, सा.बां.विभाग, मुंबई फोर्ट, मुंबई, कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.-काअ/दमुविवि/नि.लि./४९३८/२०२६-२७
दिनांक :-**०८.०९.२०२६**

**-sd-**
कार्यकारी अभियंता
दक्षिण मुंबई विद्युत विभाग,
सा.बां. विभाग, मुंबई.

आरओसी - 2026-27/क्र-5/C२८२४


Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# ७ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर ना. म. जोशी मार्ग बीडीडी चाळीतील ३४२ कुटुंबे लवकरच जाणार हक्काच्या घरात

**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** बीडीडी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत सर्वप्रथम ना. म. जोशी मार्ग बीडीडी चाळीतील रहिवाशांनी प्रकल्पाला पाठिंबा देत घरे रिकामी केली होती. मात्र पुनर्विकासाचे काम संथगतीने सुरू असल्याने हे रहिवासी गेली सात वर्षे संक्रमण शिबिरात राहत होते. आता त्यांची प्रतीक्षा अखेर संपली असून म्हाडाच्या मुंबई मंडळाने बांधलेल्या दोन पुनर्वसित इमारतींना निवासी दाखला मिळाल्यानंतर ३४२ घरांचा ताबा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रहिवाशांना नव्या घरांच्या चाव्या वितरित केल्या जाणार असून त्यासाठी मुख्यमंत्र्यांची वेळ निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. वरळी, ना. म. जोशी मार्ग आणि नायगाव येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास टप्प्याटप्प्याने सुरू असून पूर्ण



झालेल्या इमारतींचा ताबा संबंधित रहिवाशांना दिला जात आहे. ऑगस्ट २०२५ मध्ये वरळीतील ५५६ रहिवाशांना घरे देण्यात आली होती. त्यानंतर आणखी ८२७ घरांचा ताबा देण्यात आला असून ५७४ घरांचे वाटप सुरू आहे. नायगावमध्येही मार्च २०२६ मध्ये ८६४ आणि जून २०२६ मध्ये आणखी ५३७ घरांचा ताबा रहिवाशांना देण्यात आला. ना. म. जोशी मार्ग बीडीडी पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यात सात इमारतींमध्ये एकूण १,२४१ घरांचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. त्यापैकी दोन इमारतींचे काम पूर्ण होऊन त्यांना निवासी दाखला मिळाला असून ३४२ घरांचा ताबा देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. या प्रकल्पाला वेग देण्यासाठी रहिवासी आणि पुनर्विकास समितीने सातत्याने पाठपुरावा केला होता. रहिवासी कमलाकर नडगावकर यांनी अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या हक्काच्या घराचे स्वप्न आता पूर्ण होत असल्याची भावना व्यक्त केली, तर समितीचे अध्यक्ष कृष्णकांत नलगे यांनी उर्वरित पाच इमारतींचे कामही वेगाने पूर्ण करून सर्व रहिवाशांना लवकरात लवकर नव्या घरात स्थलांतरित करण्याची मागणी केली. म्हाडाच्या नियोजनानुसार उर्वरित पाच इमारतींचे काम पुढील दीड ते दोन महिन्यांत पूर्ण करून त्यांचाही ताबा देण्याचे उद्दिष्ट आहे. दरम्यान, बीडीडी चाळीतील १५ हजारांहून अधिक रहिवाशांचे पुनर्वसन असलेला हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प २०३० पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य म्हाडाने निश्चित केले असून तिन्ही पुनर्विकास प्रकल्पांच्या कामांना आता अधिक वेग देण्यात आला आहे.

# गणेशोत्सवातील ओल्या कचऱ्यापासून रुग्णालयांना मिळणार वीज

**मुंबई (राकेश गायकवाड) :** गणेशोत्सवात निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्याचा पर्यावरणपूरक पद्धतीने पुनर्वापर करून त्यातून ऊर्जा निर्मिती करण्याचा अभिनव उपक्रम मुंबई महापालिकेने सुरू केला आहे. लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या सहकार्याने 'प्रसाद टू पॉवर' हा उपक्रम राबविण्यात येत असून, या माध्यमातून तयार होणारी ऊर्जा महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये वापरण्यात येणार आहे. लालबागच्या राजाच्या मंडपातील प्रसाद कक्ष, अन्नछत्र आणि अन्य ठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणात अन्न व सेंद्रिय कचरा निर्माण होतो. या कचऱ्याचे सुरुवातीलाच स्वतंत्रपणे वर्गीकरण करून तो विशेष वाहनांद्वारे महापालिकेच्या बायोमिथेनेशन प्रकल्पांकडे पाठविला जाणार आहे. नायर, कस्तुरबा, जी.टी.बी. आणि सायन रुग्णालयांमधील बायोमिथेनेशन केंद्रांमध्ये या कचऱ्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. प्रत्येक केंद्राची दररोज सुमारे दोन मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची



क्षमता आहे. नियोजित ११ दिवसांच्या कालावधीत सुमारे ८० मेट्रिक टन सेंद्रिय कचऱ्यावर प्रक्रिया करून अंदाजे ७,७४४ युनिट अक्षय ऊर्जा निर्माण करण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट आहे.निर्मित होणाऱ्या विजेचा वापर संबंधित रुग्णालयांतील वॉर्ड, कॉरिडॉर आणि सामायिक परिसरातील प्रकाशयोजनेसह विविध आवश्यक कामांसाठी केला जाणार आहे. प्रत्यक्ष ऊर्जा निर्मितीचे प्रमाण कचऱ्याचे प्रमाण, त्याची गुणवत्ता आणि प्रकल्पाच्या कार्यक्षमतेनुसार बदलू शकते.महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. एफ/दक्षिण विभागाचे सहाय्यक आयुक्त या प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर देखरेख करीत आहेत. प्रकल्पांचे संचालन व देखभाल महापालिकेने नियुक्त केलेल्या मेसर्स एरोकेअर एव्हिएशन प्रा. लि. या संस्थेमार्फत केली जात आहे.गणेशोत्सवातील सेंद्रिय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करून त्याचे ऊर्जेत रूपांतर करण्याच्या या प्रयोगामुळे कचरा व्यवस्थापनासोबतच अक्षय ऊर्जेला चालना मिळणार आहे. 'कचऱ्यापासून ऊर्जा आणि ऊर्जेतून रुग्णालयांना प्रकाश' या संकल्पनेतून साकारलेला हा उपक्रम पर्यावरणपूरक उत्सवाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा भार; विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणामाची चिंता

**मुंबई (सम्यक कासारे) :** राज्यातील शाळा सुरू होऊन जवळपास तीन महिने झाले असतानाच शिक्षकांवरील विविध प्रशासकीय आणि अशैक्षणिक कामांचा वाढता ताण चर्चेचा विषय ठरला आहे. नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीच्या काळात विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया मजबूत करण्यावर भर देणे अपेक्षित असताना, शिक्षकांना एसआयआर, विविध सर्वेक्षणे, ऑनलाइन नोंदी, शिष्यवृत्तीची कामे आणि अहवाल तयार करण्यासाठी मोठा वेळ द्यावा लागत असल्याची तक्रार शिक्षक संघटना आणि पालकांकडून केली जात आहे. १५ जूनपासून शाळा सुरू झाल्यानंतर सुरुवातीचे काही महत्त्वाचे दिवस विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी निर्णायक मानले जातात. कोणता विद्यार्थी वाचनात मागे आहे, कोणाला लेखन किंवा गणितातील मूलभूत संकल्पना समजलेल्या नाहीत आणि कोणाला वैयक्तिक मार्गदर्शनाची गरज आहे, हे ओळखून त्यावर काम करण्याची आवश्यकता असते. मात्र, शिक्षकांचा वेळ वर्गाबाहेरील कामांमध्ये गेल्याने या प्रक्रियेला मर्यादा येत असल्याचे सांगितले जात आहे. कमी शिक्षक असलेल्या शाळांमध्ये परिस्थिती अधिक गंभीर असल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. एखादा शिक्षक प्रशासकीय कामासाठी बाहेर गेल्यास उर्वरित शिक्षकांवर अतिरिक्त वर्ग सांभाळण्याची जबाबदारी येते. अशा परिस्थितीत एकाच वेळी दोन किंवा तीन वर्ग हाताळताना प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे कठीण होते. शाळेत शिक्षक उपस्थित आहे की नाही, यापेक्षा तो प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी किती वेळ उपलब्ध होता, याचा आढावा घेण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. गेल्या तीन



महिन्यांत शिक्षकांकडून घेण्यात आलेल्या अशैक्षणिक कामांचा आणि त्यासाठी खर्च झालेल्या वेळेचा स्वतंत्र हिशोब ठेवावा, अशी मागणी शिक्षक संघटना आणि कार्यकर्त्यांकडून होत आहे. या कामांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम झाला आहे का, याची वस्तुनिष्ठ तपासणी करण्याची गरजही व्यक्त करण्यात आली आहे. शिक्षकांना अशैक्षणिक कामांपासून दूर ठेवून त्यांचा अधिकाधिक वेळ अध्यापनासाठी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य विद्यार्थी शिक्षक पालक महासंघाचे प्रसाद तुळसकर यांनी केली. तर पोर्टल, सर्वेक्षणे आणि अहवालांच्या कामामुळे शिक्षकांचा मौल्यवान अध्यापन वेळ कमी होत असल्याचे शिक्षक कार्यकर्ते भाऊसाहेब चासकर यांनी म्हटले आहे. शिक्षकांकडून प्रशासकीय कामे करून घेण्याची आवश्यकता असली तरी त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. शाळेतील प्रत्येक शिक्षकाचा वेळ विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी वापरला जातोय का, याचा आढावा घेण्याची वेळ आता आली आहे.

# मुंबईच्या पूरप्रतिबंधक उपाययोजनांची इंचॉन मंचावर मांडणी

**मुंबई (विशाल कारंडे) :** दक्षिण कोरियातील इंचॉन शहरात ७ आणि ८ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या ६व्या आंतरराष्ट्रीय आपत्ती लवचिकता नेतृत्व मंच–इंचॉन २०२६ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी मुंबई महानगरपालिकेचे प्रतिनिधित्व केले. या आंतरराष्ट्रीय मंचावर मुंबईसमोरील नागरी पूर, हवामान बदल आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या आव्हानांसह महानगरपालिकेकडून राबविण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांची माहिती जगभरातील प्रतिनिधींसमोर मांडण्यात आली. इंचॉन महानगरपालिका, संयुक्त राष्ट्र आपत्ती जोखीम निवारण कार्यालयाचे (UNDRR) ईशान्य आशिया कार्यालय, जागतिक शिक्षण व प्रशिक्षण संस्था (ONEA & GETI) आणि इंचॉन इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने या मंचाचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत ३० हून अधिक देशांचे प्रतिनिधी,




आंतरराष्ट्रीय संघटनांचे अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ सहभागी झाले होते. 'महानगरस्तरीय संपर्क व संवाद कार्यक्रम' या विशेष सत्रात अभिजीत बांगर यांनी 'मुंबईतील नागरी पूर आणि महानगरपालिकेची सज्जता' या विषयावर सविस्तर सादरीकरण केले. मुंबईसमोरील विविध आपत्तीजन्य धोक्यांची माहिती देताना त्यांनी हवामानातील बदल, अतिवृष्टी, भूस्खलन आणि किनारपट्टीवरील दाट लोकवस्ती यांसारख्या आव्हानांवर प्रकाश टाकला. सन १९७३ ते २०२० या कालावधीत वार्षिक तापमानात दर दशकाला सुमारे ०.२५ अंश सेल्सिअस वाढ झाल्याचे सादरीकरणात नमूद करण्यात आले. मुंबईत २४९ भूस्खलनप्रवण क्षेत्रे असून दरवर्षी सुमारे १६ दिवस १०० मिलिमीटरपेक्षा अधिक पावसाची नोंद होते. पूरप्रवण अतिसंवेदनशील क्षेत्राच्या २५० मीटर परिसरात मुंबईच्या सुमारे ३५ टक्के लोकसंख्येचे वास्तव्य आहे. तसेच किनारपट्टीलगत ५० हून अधिक दाट लोकवस्त्या असल्याने आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. मुंबईची पूरप्रतिबंधक क्षमता वाढविण्यासाठी महानगरपालिकेने राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या (NDMA) सहकार्याने नागरी पूर जोखीम व्यवस्थापन कार्यक्रम (UFRMP) सुरू केला आहे. या कार्यक्रमात पूरजोखीम कमी करणे, आपत्कालीन परिस्थितीतील पूर्वतयारी मजबूत करणे आणि जलनिस्सारण व्यवस्थेची क्षमता वाढविणे यावर भर देण्यात आला आहे. यामध्ये पंपिंग स्टेशन आणि होल्डिंग टँक उभारणे, पावसाच्या पाण्याच्या निचरा व्यवस्थेचे जाळे विस्तारणे व मजबूत करणे, तसेच आवश्यक ठिकाणी स्वयंचलित पूरद्वार बसविणे यांसारख्या संरचनात्मक उपाययोजनांचा समावेश आहे. अतिवृष्टीच्या काळात पाणी साचण्याचे प्रमाण कमी करून जलनिस्सारणाची क्षमता वाढविणे हा या उपाययोजनांचा प्रमुख उद्देश आहे. महानगरपालिकेकडून केवळ पारंपरिक अभियांत्रिकी उपायांवर अवलंबून न राहता निसर्गाधारित आणि तंत्रज्ञानाधारित उपाययोजनांनाही प्राधान्य दिले जात आहे. एकात्मिक पूर्वसूचना आणि पूर निरीक्षण प्रणाली, जैव-जलधारण व्यवस्था, बायोस्वेल्स, स्पंज पार्क आणि हरित मार्गिका यांसारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत. याशिवाय कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित स्मार्ट ड्रेनेज आणि नाला व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्यावरही भर देण्यात येत आहे. या माध्यमातून पावसाचे पाणी, नाले आणि जलनिस्सारण व्यवस्थेचे अधिक प्रभावी व्यवस्थापन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई (IIT-B) यांच्या सहकार्याने महानगरपालिकेने प्रगत पूर्वसूचना प्रणाली विकसित केली आहे. ही प्रणाली मुंबईतील विविध भागांसाठी तीन दिवस आधीपर्यंत पावसाचा अंदाज देण्यास सक्षम असल्याचे बांगर यांनी सांगितले. त्यामुळे अतिवृष्टीची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाला यंत्रणा सज्ज करणे आणि आपत्ती निवारणाच्या उपाययोजना वेळेत राबविणे शक्य होते. अभियांत्रिकी, निसर्गाधारित उपाय आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा समन्वय साधून मुंबईसाठी सर्वसमावेशक नागरी पूर व्यवस्थापन आराखडा विकसित केला जात असल्याचे अभिजीत बांगर यांनी मंचावर स्पष्ट केले. मुंबईच्या अनुभवांची आंतरराष्ट्रीय स्तरावर मांडणी झाल्याने इतर महानगरांशी ज्ञान आणि तंत्रज्ञानाची देवाणघेवाण करण्यासाठीही या मंचाचा उपयोग होण्याची अपेक्षा आहे.

# मुंबईत राडारोडा वाहतुकीवर कडक नजर; MDCTS नोंदणी अनिवार्य

**मुंबई (नितीन देवळेकर) :** बांधकाम आणि पाडकामातून निर्माण होणाऱ्या राडारोड्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियमांची अंमलबजावणी अधिक कडक केली आहे. बांधकाम व पाडकाम राडारोडा (C&D Waste) निर्माण करणारे, त्यावर प्रक्रिया करणारे, पुनर्वापर करणारे तसेच त्याची वाहतूक करणारे सर्व संबंधित घटक आणि वाहने 'मुंबई राडारोडा नियंत्रण व मागोवा प्रणाली' (MDCTS) वर नोंदणीकृत असणे बंधनकारक करण्यात आले आहे. महानगरपालिकेने यासाठी स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली सुरू केली असून, संबंधितांना २३ सप्टेंबर २०२६पर्यंत नोंदणी करण्याची मुदत देण्यात आली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून राडारोड्याची निर्मिती, वाहतूक, प्रक्रिया आणि अंतिम विल्हेवाट यावर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. राडारोडा वाहून नेणाऱ्या प्रत्येक वाहनावर अधिकृत 'वाहन मागोवा व देखरेख प्रणाली' (VTMS) बसविणे आवश्यक आहे. त्यामुळे वाहन कुठून राडारोडा घेऊन निघाले, कोणत्या मार्गाने गेले आणि तो अधिकृत ठिकाणी पोहोचविण्यात आला की नाही, यावर देखरेख ठेवणे शक्य होणार आहे. BMC च्या पूर्वीच्या C&D



Waste व्यवस्थापन निविदांमध्येही वाहनांवर VTMS/GPS प्रणालीचा वापर करण्याची तरतूद करण्यात आली होती. महानगरपालिकेच्या सूचनेनुसार, राडारोडा वाहतुकीसाठी केवळ नोंदणीकृत व अधिकृत वाहतूकदाराचीच नियुक्ती करावी लागणार आहे. तसेच राडारोडा केवळ महानगरपालिकेने अधिकृत केलेल्या ठिकाणीच नेऊन टाकणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे बंधनकारक राहणार आहे. प्रकल्प सुरू करणाऱ्या संबंधित घटकांना विहित नमुन्यात C&D Waste Management Plan सादर करावा लागणार आहे. बांधकाम किंवा पाडकामातून निर्माण होणारा राडारोडा आणि उत्खननातून निघणारी माती किंवा अन्य साहित्य स्वतंत्र ठेवणे तसेच त्यांची स्वतंत्र वाहतूक करणे आवश्यक करण्यात आले आहे. वाहतुकीदरम्यान राडारोडा रस्त्यावर सांडू नये आणि धुळीमुळे प्रदूषण होऊ नये, यासाठी वाहन योग्य प्रकारे झाकणेही बंधनकारक आहे. मुंबईत C&D Waste चे स्वतंत्र संकलन, वाहतूक आणि वैज्ञानिक प्रक्रियेसाठी यापूर्वीही महानगरपालिकेने विविध यंत्रणा उभारल्या आहेत. MDCTS वर नोंदणी नसलेल्या किंवा अधिकृत VTMS प्रणाली नसलेल्या वाहनातून C&D Waste ची वाहतूक केल्यास प्रति वाहन, प्रति उल्लंघन २५ हजार रुपये दंड आकारण्यात येणार आहे. याशिवाय अनधिकृत ठिकाणी राडारोडा टाकणे, परवानगीशिवाय वाहतूक करणे किंवा नियमबाह्य विल्हेवाट लावणे आढळल्यास संबंधितांवर कठोर दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते. गरज भासल्यास काम स्थगित करणे, परवानग्या रद्द करणे आणि बँक हमी जप्त करण्यासारख्या कारवाईचाही इशारा प्रशासनाने दिला आहे. मुंबईतील वाढत्या बांधकामामुळे निर्माण होणारा राडारोडा रस्त्याच्या कडेला, मोकळ्या जागेत किंवा नाल्यांमध्ये टाकल्यास धूळ, वाहतूक कोंडी, जलनिस्सारणाच्या समस्या आणि पर्यावरणावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे MDCTS आणि VTMSच्या माध्यमातून राडारोड्याच्या संपूर्ण प्रवासाचा मागोवा घेण्यावर महानगरपालिकेने भर दिला आहे.

# कुर्ला परिसर ड्रग्ज माफियांच्या विळख्यात; पोलिसांचे दुर्लक्ष?

**मुंबई (गणेश बागडे) :** कुर्ला पोलीस ठाणे आणि विनोबा भावे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अंमली पदार्थांचा कथित खुलेआम व्यापार सुरू असून, ड्रग्ज माफियांनी संपूर्ण परिसरात आपले जाळे पसरवल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते ॲड. कमलेश हडकर यांनी केला आहे. अंमली पदार्थ विक्रीची ठिकाणे आणि संबंधित व्यक्तींची नावे पोलिसांना वारंवार देऊनही गेल्या दोन वर्षांत कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.




त्यामुळे कुर्ल्यातील तरुण पिढी नशेच्या विळख्यात सापडत असताना पोलीस यंत्रणा नेमकी कोणाची वाट पाहत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. कुर्ला पश्चिमेतील उर्दू बाग लेन, मायकल कंपाउंड, उनवाला कंपाउंड, बाबू कसाई गल्ली, रेल्वे पटरी परिसर, राम बच्चन तबेला सी ब्लॉक, एलआयजी व एमआयजी कॉलनी, ब्राह्मणवाडी, कुर्ला नर्सिंग होमजवळील पार्किंग, अर्पण हॉस्पिटलसमोरील परिसर, स. गो. बर्वे मार्ग, न्यू मॉडेल सिनेमा ट्रान्झिट कॅम्प, बुद्ध कॉलनी, बालाजी मंदिर गल्ली, पाइप रोड, भारती नगर, कोहिनूर सिटी परिसर, गावदेवी मंदिर, वाडिया इस्टेट, क्रांती नगर, हालाव पूल, ख्रिश्चन गाव आणि इंदिरा नगर आदी भागांत अंमली पदार्थांची विक्री होत असल्याचा आरोप हडकर यांनी केला आहे. बाहेरील भागांतूनही नशेखोर खरेदीसाठी येत असल्याचा दावा त्यांनी केला. अल्पवयीन मुलांना पैशांचे आमिष दाखवून ड्रग्ज विक्रीसाठी वापरले जात असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. व्यसनासाठी पैसे मिळविण्याच्या प्रयत्नात काही तरुण गुन्हेगारीकडे वळत असल्याचा आरोपही त्यांनी केला. ड्रग्जच्या कथित व्यापाराबरोबरच नशेमन हॉटेलजवळ, तकिया वार्ड, बुद्ध कॉलनी, वाडिया इस्टेट, ख्रिश्चन गाव आणि क्रांती नगर परिसरात मटका व्यवसाय तसेच पत्त्यांचे क्लब सुरू असल्याचा आरोप हडकर यांनी केला आहे.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला, भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
E-mail-northmumbai.ee@mahapwd.com दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३१९६४ फॅक्स - २६२०५७८८

कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, दादाभाई मार्ग, भवन्स कॉलेज जवळ अंधेरी (प) मुंबई-४०००५८ (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) मुंबई उपनगरीय जिल्हा (पश्चिम उपनगर) कामगार सहकारी संस्था लि., मुंबई यांच्याकडून, बी-1 नमुन्यातील खालील कामासाठी ऑनलाइन ई-निविदा प्रणालीद्वारे ई-निविदा मागविण्यात येत आहे. ही संस्था महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात (P.W.D.) नोंदणीकृत असून, महाराष्ट्र शासनाच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अंधेरी (पश्चिम), मुंबई-58 यांच्यामार्फत निविदा मागविण्यात येत आहे. निविदा दस्तऐवज महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या पोर्टलवरून डाउनलोड करता येतील. संस्था केवळ स्तंभ 4 मध्ये नमूद केलेल्या त्यांच्या उपनगरीय क्षेत्रानुसारच अर्ज करू शकतात. इतर कोणत्याही संस्थांचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही. **निविदा सुचना क्र.२५ नुसार, एकुण-२३** कामांचा निविदा विक्री कालावधी दि.१०/०९/२०२६, दुपारी १५.०० पासून ते दि.१७/०९/२०२६, दुपारी १५.०० पर्यंत असुन "बी-१" नमुन्यातीलनिविदा मागवित आहेत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां) विभाग, अंधेरी, मुंबई यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जानार नाही.

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ ५४५७ दिनांक :- 03 SEP 2026
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
अंधेरी (प.)मुंबई ५८.

आरओसी - 2026-27/क्र-5/C२७३४

# ठाण्यात मोठ्या होर्डिंग्स कंपन्यांकडून नियमांचे उल्लंघन

**ठाणे (तृप्ती गोरे) :** ठाण्यात मोठ्या होर्डिंग्स कंपन्यांकडूनच नियमांचे उल्लंघन करून परवानगी पेक्षा जास्त साईजचे होर्डिंग्स उभारण्यात आल्याची गंभीर बाब ठाणे काँग्रेसचे माजी अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी उघडकीस आणली आहे. ठाणे महापालिकेच्या जाहिरात विभागाकडून केवळ ६०५ होर्डिंग्सला अधिकृत परवानगी देण्यात आली असली तरी, प्रत्यक्षात मात्र ठाण्यात १५०० पेक्षा जास्त होर्डिंग्स उभारण्यात आली आहेत. तर ज्यांना अधिकृत परवानगी देण्यात आली आहे त्याच मोठ्या कंपन्यांनी प्रमाणापेक्षा जास्त साईजचे होर्डिंग्स उभारले असून यामुळे नागरिकांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करून जी होर्डिंग्स उभारण्यात आली आहे ती तात्काळ हटवण्यात यावी अन्यथा, पालिका मुख्यालयाच्या बाहेर आमरण उपोषण करण्याचा इशारा विक्रांत चव्हाण यांनी ठाणे महापालिकेला दिला आहे. ठाण्यातील होर्डिंग्सच्या संदर्भात नगरसेविका मार्जिया पठाण यांनी महासभेत प्रश्न विचारले होते. तर दुसरीकडे काँग्रेसचे माजी अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी ठाण्यातील होर्डिंग्सच्या संदर्भात गंभीर बाब समोर आणली आहे. होर्डिंग्स संदर्भात असलेल्या २०२२ च्या जी आर नुसार तसेच वाहतूक विभागाच्या नियमानुसार होर्डिंग्सची साईज आणि होर्डिंग्स कसे असावे याचे नियम आहेत. मात्र या नियमांची मोठ्या होर्डिंग्स कंपन्यांकडून सर्रासपणे उल्लंघन करण्यात आले असल्याची माहिती विक्रांत चव्हाण यांनी उघड केली आहे. नियमानुसार होर्डिंग्जच्या




आकारासाठी ४० बाय ३० अशी मर्यादा आहे. मात्र शहरातील सर्वच होर्डिंग्ज या निकषापेक्षा मोठ्या आकाराच्या असल्याचा दावा चव्हाण यांनी केला. मोठ्या आकाराच्या होर्डिंगला परवानगी देताना महापालिकेनेही सर्व नियम धाब्यावर बसवले आहेत. वास्तविक अशा प्रकारे मोठ्या होर्डिंग ला पालिका परवानगीच देऊ शकत नाही. त्यामुळे महापालिका प्रशासनाने प्रत्येक होर्डिंग्जची लांबी, रुंदी, उंची आणि प्रत्यक्ष परवानगी यांची तपासणी करावी, अशी मागणी त्यांनी केली. वाहतूक विभागाच्या नियमांनुसार होर्डिंग्ज आकर्षक असले तरी भडक स्वरूपाचे नसावेत, अत्यावश्यक सेवांच्या वाहनांना अडथळा निर्माण होऊ नये आणि वाहतुकीस धोका निर्माण होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक असल्याचे चव्हाण यांनी सांगितले. मात्र प्रत्यक्षात या नियमांचे पालन होत नसल्याचा आरोप त्यांनी केला.

## पालिकेच्या वास्तूतही नियमबाह्य फलक?

ठाणे महापालिकेच्या वास्तूंमध्येही होर्डिंग्जना परवानगी देण्यात आल्याचा आरोप करत चव्हाण यांनी प्रशासनाला सवाल केला आहे. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहाच्या ठिकाणी एका होर्डिंग्जला परवानगी असताना प्रत्यक्षात तीन होर्डिंग्ज उभारण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. महापालिकेच्या मालकीच्या वास्तूंमध्ये परवानगीपेक्षा जास्त होर्डिंग्ज उभारण्यात आली असतील तर संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणीही त्यांनी केली.स्मशानभूमीच्या परिसरातही होर्डिंग्जना परवानगी देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

## '१९ कोटींसाठी नागरिकांचे जीव धोक्यात?'

महापालिकेला मिळणाऱ्या जाहिरात महसुलासाठी नागरिकांच्या जीविताशी तडजोड केली जात असल्याचा आरोप चव्हाण यांनी केला. होर्डिंग्जमधून सुमारे १९ कोटी रुपयांचा महसूल मिळविण्यासाठी प्रशासन नागरिकांच्या सुरक्षिततेला धोक्यात घालत असल्याचे त्यांनी म्हटले. भविष्यात विमानांना धडकतील अशा पद्धतीने होर्डिंग्ज उभारण्याची वेळ येऊ नये, असा टोलाही त्यांनी प्रशासनाला लगावला आहे.

नियमांचे उल्लंघन करणारी सर्व होर्डिंग्ज तातडीने हटवावीत आणि शहरातील होर्डिंग्जचे सर्वंकष ऑडिट करावे, अशी मागणी विक्रांत चव्हाण यांनी केली आहे. महापालिका प्रशासनाने कारवाई केली नाही तर पालिका मुख्यालयाबाहेर आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला. 'अशोक वैती महापालिका मुख्यालयात जाऊन बसू शकतात, तर मीदेखील नागरिकांच्या प्रश्नासाठी मुख्यालयात जाऊन बसेन,' असे चव्हाण यांनी सांगितले. त्यामुळे ठाण्यातील बेकायदा होर्डिंग्जचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, महापालिका प्रशासन आता याबाबत काय भूमिका घेते, याकडे ठाणेकरांचे लक्ष लागले आहे. डीपी रस्ते, फुटपाथवरही होर्डिंग्ज नाला, डीपी रस्ते, फुटपाथ, खासगी सोसायट्यांच्या जागा तसेच महापालिकेच्या वास्तूंमध्येही होर्डिंग्ज उभारण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. मोकळ्या जागेत होर्डिंग्ज उभारण्यास परवानगी देताना त्या जागेचा वापर बाधित होत नाही ना, याची तपासणी करणे आवश्यक असतानाही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चव्हाण यांनी म्हटले. खासगी सोसायट्यांच्या जागेत केवळ १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर करार करून होर्डिंग्ज उभारण्यास परवानगी दिली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. ९ मे २०२२ च्या शासन निर्णयानुसार संबंधित प्रक्रिया होत असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात नियमांचे पालन होत नसल्याचा दावा त्यांनी केला.

# उल्हासनगरच्या सात स्वीकृत जागांचा मार्ग मोकळा; उच्च न्यायालयाचा १५ दिवसांत निवडणूक घेण्याचा आदेश

**उल्हासनगर (विशाल कारंडे) :** उल्हासनगर महानगरपालिकेतील सात स्वीकृत सदस्यांच्या रखडलेल्या निवडणुकीला अखेर मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे वेग मिळाला आहे. स्थगित करण्यात आलेली निवडणूक प्रक्रिया पुढील १५ दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश न्यायालयाने दिल्याची माहिती याचिकाकर्ते तथा भाजपचे शहराध्यक्ष राजेश वधारिया यांनी दिली. या निर्णयानंतर भाजप कार्यकर्त्यांनी पेढे वाटून जल्लोष केला.स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीची प्रक्रिया अचानक अनिश्चित काळासाठी थांबविण्यात आल्याने भाजपकडून त्याविरोधात न्यायालयात धाव घेण्यात आली होती. राजेश वधारिया यांनी याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. याचिकेवर अवघ्या दोन दिवसांत सुनावणी




झाली. न्यायालयाने प्रशासनाने घेतलेली स्थगितीची भूमिका रद्द करत निवडणूक प्रक्रिया निर्धारित कालावधीत पूर्ण करण्याचे आदेश दिल्याचे वधारिया यांनी सांगितले. दरम्यान, महापालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्याशी या निर्णयाबाबत संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नसल्याचे सांगण्यात आले. भाजपमध्ये जल्लोष न्यायालयाचा निर्णय समोर आल्यानंतर भाजपच्या स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. शहराध्यक्ष राजेश वधारिया यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी पक्ष कार्यालयात एकमेकांना पेढे भरवत निकालाचे स्वागत केले. न्यायालयाच्या आदेशामुळे आता स्वीकृत सदस्यांच्या सातही जागांच्या निवडीची प्रक्रिया पुढे नेणे प्रशासनाला बंधनकारक ठरणार आहे. त्यामुळे सत्ताधारी आघाडीतील घटक पक्षांमध्ये उमेदवारांच्या नावांवर पुन्हा चर्चा होण्याची शक्यता आहे. या सात जागांवर कोणाची निवड होते, याकडे उल्हासनगरच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.७८ पैकी ७७ नगरसेवक सत्ताधारी आघाडीकडे उल्हासनगर महापालिकेत शिवसेना आणि भाजपची आघाडी सत्तेत आहे. महापालिकेच्या ७८ जागांपैकी ७७ नगरसेवक सत्ताधारी गटाकडे असल्याने स्वीकृत सदस्यांच्या सात जागांवर आघाडीतील घटक पक्षांचीच वर्णी लागण्याची शक्यता आहे.या निवडीसाठी ११ सप्टेंबर रोजी विशेष महासभेचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेच्या आधीच महापौर अश्विनी निकम यांनी आयुक्तांना पत्र देत कायदेशीर कारणांचा हवाला देऊन निवडणूक स्थगित करण्याची सूचना केली. त्यानंतर आयुक्तांनी निवडणूक प्रक्रिया अनिश्चित काळासाठी पुढे ढकलली होती.आघाडीतील मतभेद चर्चेत निवडणूक अचानक स्थगित झाल्यानंतर शिवसेना आणि भाजपमधील अंतर्गत मतभेद पुन्हा चर्चेत आले. स्वीकृत सदस्यांच्या उमेदवारीवर एकमत न झाल्यामुळेच निवडणूक थांबविण्यात आल्याची राजकीय चर्चा शहरात सुरू होती. दरम्यान, दोन नगरसेवकांचे पद रद्द झाल्याने शिवसेनेचे संख्याबळ कमी झाले असून त्याचा परिणाम स्वीकृत सदस्यांच्या जागावाटपावर होण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर भाजपने स्थगितीला विरोध करत न्यायालयात याचिका दाखल केली. आता न्यायालयाच्या आदेशामुळे निवडणूक प्रक्रिया पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला असून सात जागांवर कोणत्या पक्षाच्या कोणत्या उमेदवारांना संधी मिळते, याची उत्सुकता वाढली आहे.

# वायुप्रदूषण नियंत्रणासाठी आयुक्तांचे सक्त निर्देश

**भिवंडी (गणेश बागडे) :** मुंबई महानगर प्रदेशातील नागरी भागात हवा प्रदूषणामुळे उद्भवलेल्या समस्यांचे अनुषंगाने मा . मुंबई उच्च न्यायालयाने स्वतःहुन दाखल केलेल्या जनहित याचिकेतील निर्देशानुसार शासनाच्या पर्यावरण विभागाने हवा प्रदूषण नियंत्रणासाठी सर्व समावेशक मार्गदर्शक सूचना जाहिर केल्या असून त्यांची अंमलबजावणी साठी दोन सदस्यीय न्यायालयीन उच्चाधिकार समिती गठीत केली आहे . या अनुषंगाने महापालिका आयुक्त अनमोल सागर यांच्या अध्यक्षतेखाली वरिष्ठ अधिकारी यांचे आढावा बैठकीत सर्व संबंधीत अधिकारी यांनी मा . उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार मार्गदर्शक सुचनांची काटेकोर पणे




करण्याचे निर्देश दिले . तसेच निर्देशांचे अनुपालन करण्यात कसूर करणारे अधिकारी यांना वैयक्तिक जबाबदार धरून शिस्तभंग कारवाई करण्यात येईल असा सक्त इशारा दिला . या बैठकीत शहरातील निर्माणाधीन बांधकाम स्थळे, पाडकाम स्थळे , राडा रोडा व औद्योगिक आस्थापना मुळे होणारे हवा प्रदूषण शमविणे, रस्ते सफाई आराखडा , घनकचरा व्यवस्थापन आराखडा, जनजागृती अभियान आराखडा, पर्यावरण पुरक इंधन वापर, वृक्ष लागवड व हरित पट्टे निर्मिती आराखडा बाबत सविस्तर आदेश देण्यात आले. बैठकिस अतिरिक्त आयुक्त, सहायक संचालक नगर रचना, शहर अभियंता, उपायुक्त (पर्यावरण), उपायुक्त ( आरोग्य ), उपअभियंता, सहायक आयुक्त , प्रभाग अधिकारी इत्यादी उपस्थित होते

# ठाणे महापालिकेची सिंगल यूज प्लास्टिकविरोधात धडक कारवाई





**ठाणे (राकेश गायकवाड) :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सिंगल यूज प्लास्टिकचा वापर आणि विक्री करणाऱ्यांविरोधात महापालिकेच्या प्रदूषण नियंत्रण विभाग आणि घनकचरा व्यवस्थापन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कारवाई करण्यात आली. या कारवाईत ७५ आस्थापंनाची तपासणी करुन ९९ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करुन ७९००० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. या मोहिमेंतर्गत माजिवडा-मानपाडा, मुंब्रा आणि नौपाडा-कौपरी प्रभाग समिती क्षेत्रात विशेष पथकांमार्फत बाजारपेठा, व्यावसायिक आस्थापना, फेरीवाले आणि दुकानांची तपासणी करण्यात आली. प्रतिबंधित सिंगल यूज प्लास्टिक आढळून आलेल्या संबंधितांवर दंडात्मक कारवाई करून प्लास्टिक जप्त करण्यात आले. माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रात एकूण ३५ आस्थापनांना दिलेल्या भेटीत १८ किलो प्लास्टिक जप्त करून १८ हजार इतका दंड आकारण्यात आला. मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रात एकूण १० आस्थापनांना दिलेल्या भेटीत २७ किलो प्लास्टिक जप्त करुन १५ हजार इतका तर नौपाडा कोपरी प्रभाग समिती क्षेत्रात ३० आस्थापनांना भेटी देवून ५४ किलो प्लास्टिक जप्त करुन ४६ हजार इतका दंड वसूल करण्यात आला आहे. महापालिकेमार्फत सिंगल यूज प्लास्टिकच्या वापराविरोधात सातत्याने कारवाई करण्यात येत असून सदरची मोहिम यापुढेही सुरू राहणार असल्याचे प्रदुषण नियंत्रण विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# पवित्र पोर्टलद्वारे जिल्हा परिषदेत नवीन १८२ शिक्षकांची भरती प्रक्रिया पूर्ण

## मराठी व उर्दू माध्यमातील पात्र शिक्षकांना तालुकानिहाय समुपदेशनातून पदस्थापना

**ठाणे (गणेश बागडे) :** पवित्र पोर्टलमार्फत करण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेअंतर्गत शिफारस झालेल्या उमेदवारांचे समुपदेशन व पदस्थापना प्रक्रिया दि. ११ सप्टेंबर, २०२६ रोजी बी. जे. हायस्कूल येथे पार पडली. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाने पारदर्शक पद्धतीने समुपदेशनाद्वारे पात्र शिक्षकांना उपलब्ध रिक्त पदांनुसार तालुकानिहाय पदस्थापना देण्यात आली. पवित्र पोर्टलच्या जाहिरातीत मराठी माध्यमासाठी ४९९ तर उर्दू माध्यमासाठी २७ पदे प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार मराठी माध्यमात इयत्ता पहिली ते पाचवी सर्व विषयांसाठी ८६ शिफारसींपैकी ७७ उमेदवार पात्र,



इयत्ता सहावी ते आठवी विज्ञान-गणित विषयासाठी ८० शिफारसींपैकी ७३ पात्र, तर इयत्ता सहावी ते आठवी भाषा विषयासाठी २५ शिफारसींपैकी २१ पात्र ठरले आहेत. अशा प्रकारे मराठी माध्यमासाठी एकूण १९१ शिफारसी असून १७१ उमेदवार पात्र ठरले. उर्दू माध्यमात इयत्ता पहिली ते पाचवी सर्व विषयांसाठी ४ शिफारसी व ४ पात्र, इयत्ता सहावी ते आठवी विज्ञान-गणितासाठी ६ शिफारसी व ६ पात्र, तर इयत्ता सहावी ते आठवी भाषा विषयासाठी १ शिफारस व १ पात्र उमेदवार आहे. उर्दू माध्यमासाठी एकूण ११ शिफारसी असून सर्व ११ उमेदवार पात्र ठरले आहेत. एकूण शिफारसी २०२ असून त्यापैकी १८२ उमेदवार पात्र ठरले आहेत. ११ उमेदवारांच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्या असून ९ उमेदवार गैरहजर होते. पदस्थापनेनुसार मराठी माध्यमातील शिक्षकांना अंबरनाथ ३६, भिवंडी ३९, कल्याण ३६, शहापूर १५ आणि मुरबाड ३५ या तालुक्यांमध्ये पदस्थापना देण्यात आली. यापैकी २३ शिक्षकांना पेसा क्षेत्रात तर १४८ शिक्षकांना नॉन-पेसा क्षेत्रात समुपदेशनाद्वारे पदस्थापना देण्यात आली. उर्दू माध्यमातील अंबरनाथ ३, कल्याण ४, शहापूर १ आणि भिवंडी ३, अशा एकूण ११ शिक्षकांना नॉन-पेसा क्षेत्रात पदस्थापना देण्यात आली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, शिक्षणाधिकारी प्राथमिक बाळासाहेब राक्षे, भिवंडी, मुरबाड व शहापूर तालुक्यांचे गटशिक्षणाधिकारी, सहाय्यक प्रशासन अधिकारी (शिक्षण) योगिता धीवर, सहाय्यक प्रशासन अधिकारी (सामान्य प्रशासन) नितीन घोडके, विस्तार अधिकारी शिक्षण आशिष झुंजारराव तसेच शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखत पात्र उमेदवारांना समुपदेशनाद्वारे उपलब्ध पदांवर पदस्थापना देण्यात आली. समुपदेशन प्रक्रिया पारदर्शक पार पाडल्याने उपस्थित उमेदवारांनी समाधान व्यक्त केले.

# कुपोषणाविरोधात पालघरचा नवा निर्धार; ७९९ बालकांची अधिकारी घेणार जबाबदारी

**पालघर (रघुनाथ कदम) :** जिल्ह्यातील कुपोषणाचे प्रमाण तुलनेने कमी होत असले तरी अतितीव्र आणि मध्यम तीव्र कुपोषित बालकांना विशेष पोषण व आरोग्यविषयक देखरेखीची गरज आहे. या पार्श्वभूमीवर पालघर जिल्हा परिषदेने 'सुपोषण साथी पालघर' हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील ६५ अतितीव्र (SAM) आणि ७३४ मध्यम तीव्र (MAM) अशा एकूण ७९९ कुपोषित बालकांना अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून दत्तक घेऊन त्यांच्या आरोग्याची जबाबदारी सांभाळली जाणार आहे. राष्ट्रीय पोषण माहाच्या जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद, पालघर येथे जिल्हाधिकारी डॉ. इंदु



राणी जाखड यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या उपस्थितीत 'सुपोषण साथी पालघर' उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.कुपोषित बालकांना आवश्यक पोषण, आरोग्य सुविधा आणि योग्य संगोपन मिळवून देत त्यांना सर्वसामान्य आरोग्याच्या पातळीवर आणणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती स्तरावरील अधिकारी-कर्मचाऱ्यांना बालकांच्या देखरेखीची जबाबदारी देण्यात येणार आहे. सहा महिने विशेष देखरेख पहिल्या टप्प्यात १५ सप्टेंबरपासून पुढील सहा महिने म्हणजे १५ मार्च २०२७पर्यंत ६५ अतितीव्र कुपोषित बालकांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. त्यानंतर मध्यम तीव्र कुपोषित असलेल्या ७३४ बालकांपर्यंत हा उपक्रम विस्तारण्यात येणार आहे. दत्तक घेतलेल्या प्रत्येक बालकासाठी स्वतंत्र आरोग्य कार्ड तयार केले जाणार आहे. संबंधित अधिकारी महिन्यातून किमान एकदा बालक आणि त्याच्या कुटुंबीयांची भेट घेऊन वजन, उंची व वाढीचा वेग, लसीकरण, आरोग्य तपासणी, आहार आणि औषधोपचाराची गरज यांचा आढावा घेणार आहेत.कुटुंबाच्या आर्थिक स्थितीकडेही लक्ष कुपोषण केवळ आहाराच्या कमतरतेमुळे निर्माण होत नाही, त्यामुळे बालकाच्या कुटुंबाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारण्यावरही उपक्रमात भर देण्यात येणार आहे. पात्र कुटुंबांना शासन आणि जिल्हा परिषदेच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी अधिकारी प्रयत्न करणार आहेत.यासोबतच कुटुंबीयांना स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी, बालसंगोपन, संतुलित आहार आणि आरोग्यविषयक सवयींबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. आवश्यकतेनुसार व्यसनाधीनता आणि अंधश्रद्धेविरोधात समुपदेशनही करण्यात येणार आहे. गरजेनुसार उपचार केंद्रात दाखल अधिक कुपोषित बालकांना आवश्यकतेनुसार बाल विकास केंद्र (VCDC) आणि पोषण पुनर्वसन केंद्र (NRC) येथे दाखल करून उपचार व अतिरिक्त पोषण आहार उपलब्ध करून देण्याची कार्यवाही केली जाणार आहे.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**दक्षिण मुंबई (विद्युत) सा.बां.विभाग, मुंबई**
**बांधकाम भवन, १ ला मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-०१.**

**मेल पत्ता :-** elsouthmumbai.ee@mahapwd.gov.in **दूरध्वनी क्रमांक-०२२-२२००८४४८**

**ई निविदा सुचना क्र. २० सन २०२६-२७ (दुसरी मागणी)**

कार्यकारी अभियंता दक्षिण मुंबई (विद्युत) विभाग, सा.बां.विभाग, मुंबई फोर्ट, मुंबई, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून विद्युत अनुज्ञापतीधाकर कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता प्रारुप बी-१ नमून्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कादपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग मुंबई यांना राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारण्यात येणार नाही.

**कामाचे नाव :** १) अंदाजपत्रक क्र. ओडब्लु / एमएच / एचएल / ३६४६ / २०२५-२६: मलबार हिल, मुंबई येथील 'जी.बी. नंदनवन' (माननीय उपमुख्यमंत्री यांचे निवासस्थान) येथे 'ऑडिओ-व्हिज्युअल कॉन्फरन्सिंग आणि कंट्रोल सिस्टम'चा पुरवठा, चाचणी आणि कार्यान्वित करणे. 2) अंदाजपत्रक क्र. ओडब्लु / एमएच / एचएल / ७५६५ / २०२६-२७: मलबार हिल, मुंबई येथील 'जी.बी. वर्षा', 'जी.बी. तोरणा' आणि 'जी.बी. नंदनवन' येथे ई-व्हेईकल चार्जर पुरवठा करणे. **(दुसरी मागणी)**

**अंदाजित किंमत रुपये :** २,५७,००,१९६/- (दोन कोटी सतावन लक्ष एक हजार शहान्नव फक्त )

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :** दिनांक ११.०९.२०२६ दुपारनंतर १७:०० पासून ते दिनांक १९.०९.२०२६ रोजी १७:०० वाजेपर्यंत

**ई-निविदा उघडणे व ठिकाण :** दिनांक २२.०९.२०२६ रोजी दुपारनंतर १७:०० वाजता अधीक्षक अभियंता (वि), मुंबई प्रादेशिक विदयुत मंडळ, सा.बां. विभाग मुंबई.

सविस्तर माहिती खालील प्रमाणे उपलब्ध आहे.

१. **https://mahatenders.gov.in**
**(सदर निविदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)**
२. कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई (विद्युत) विभाग, सा.बां.विभाग, मुंबई फोर्ट, मुंबई, कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.-काअ/दमुविवि/नि.लि./**४९३१**/२०२६-२७
दिनांक :-**०८.०९.२०२६**

कार्यकारी अभियंता
दक्षिण मुंबई विदयुत विभाग
सा. बां. विभाग, मुंबई

आरओसी - 2026-27/क्र-5/C२७६०

# कोकणात निघालेल्या चाकरमान्यांचे हाल; मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडीने प्रवाशांचा कोंडमारा

## इंदापूर ते कोलाडदरम्यान वाहनांच्या लांबच लांब रांगा; गणेशभक्तांचा १० ते १२ तासांचा प्रवास

**रायगड (सचिन कदम) :** गणेशोत्सवासाठी आपल्या गावाकडे कोकणात निघालेल्या चाकरमान्यांना यंदाही मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडीचा मोठा फटका बसला आहे. इंदापूर ते कोलाडदरम्यान मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, गणेशभक्तांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. मुंबई, पनवेल परिसरातून रात्रीच्या प्रवासाला निघालेल्या अनेक गणेशभक्तांना पनवेल ते इंदापूर हे अंतर पार करण्यासाठी तब्बल दहा ते बारा तास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या कोंडीमुळे वयोवृद्ध नागरिक, महिला तसेच लहान मुलांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. अनेक प्रवासी तासन्तास



वाहनांमध्ये अडकून पडल्याने पाणी, अन्न, स्वच्छतागृह आणि इतर मूलभूत सुविधांचा प्रश्नही निर्माण झाला आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम गेल्या १७ ते १८ वर्षांपासून रखडलेले असल्याने दरवर्षी गणेशोत्सव, शिमगा तसेच इतर सणांच्या काळात कोकणात येणाऱ्या नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. इंदापूर बायपास आणि माणगाव बायपासचे कामदेखील अनेक वर्षांपासून रखडल्याने वाहतुकीवरील ताण आणखी वाढत आहे. दरवर्षी महामार्गाचे काम पूर्ण करण्याचे तसेच वाहतूक सुरळीत करण्याची आश्वासनांची खैरात कोकणातील खासदार तसेच मंत्र्यांकडून केली जाते; मात्र प्रत्यक्षात सणासुदीच्या काळात परिस्थिती जैसे थेच राहते. त्यामुळे 'कोकणच्या विकासाचा महामार्ग कधी पूर्ण होणार?' असा संतप्त सवाल कोकण चाकरमानी आणि कोकणवासीयांकडून उपस्थित केला जात आहे. तसेच पोलीस बंदोबस्त असूनही वाहतूक कोंडी कायम गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई-गोवा महामार्गावर रायगड पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलीस कर्मचारी दरवर्षी प्रयत्न करत असले तरी वाहनांची वाढलेली संख्या आणि रखडलेले महामार्गाचे काम यामुळे वाहतूक कोंडीवर प्रभावी तोडगा निघताना दिसत नाही. गणेशोत्सवासाठी आनंदाने आणि उत्साहाने आपल्या गावाकडे निघालेल्या चाकरमान्यांना दरवर्षी अशाच प्रकारच्या वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. महामार्गाचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करून इंदापूर व माणगाव बायपाससह वाहतूक व्यवस्थेचा कायमस्वरूपी प्रश्न सोडवावा, अशी मागणी चाकरमानी व कोकणवासीयांकडून जोर धरू लागली आहे.

# डुबेरे-भगूर मार्ग आणि बोरखिंड इंटरचेंजसाठी ३४४ कोटी

**नाशिक (भावना जैन) :** सिन्नर तालुक्यातील डुबेरे ते भगूर मार्गाच्या विकासाला मोठी चालना मिळाली आहे. डुबेरे-सोनारी-सोनांबे-शिवडे-पांढुर्ली-विंचुरीदळवी ते भगूर या प्र.जि.मा.-२६ रस्त्याच्या १३/६०० ते २२/९०० किलोमीटरच्या टप्प्यातील कामांसह बोरखिंड येथे समृद्धी महामार्गाला जोडणाऱ्या इंटरचेंजच्या बांधकामासाठी राज्य शासनाने ३४३ कोटी ९९ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे सिन्नर तालुक्यातील ग्रामीण भागाचा समृद्धी महामार्गाशी थेट संपर्क अधिक सुलभ होण्याची अपेक्षा आहे. आमदार माणिकराव कोकाटे यांच्या पुढाकारामुळे या प्रकल्पाला मंजुरी मिळाल्याचे सांगण्यात आले आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून सुमारे १३.३०० किलोमीटर रस्त्याचे विविध प्रकारे सुधारणा व मजबुतीकरण करण्यात येणार आहे. यामध्ये मातीकाम, खडीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण तसेच आवश्यक ठिकाणी काँक्रीट रस्त्याची कामे केली जाणार आहेत. त्यामुळे या मार्गावरून होणारी वाहतूक अधिक सुरक्षित आणि सुरळीत होण्यास मदत होईल. रस्त्याच्या विकासासोबतच वाहतुकीसाठी आवश्यक पायाभूत सुविधाही उभारण्यात येणार आहेत. प्रकल्पात चार मोठे पूल, चार लहान पूल, सात वाहतूक भुयारी मार्ग, पाच



बॉक्स कल्वर्ट आणि दोन पाइप कल्वर्ट बांधण्याचा समावेश आहे. प्रकल्पामध्ये संरक्षक भिंती, आरसीसी व कच्चे गटर्स, मुरूम बाजूपट्टी, पेव्हर ब्लॉक, बसथांबे, वृक्षलागवड आणि सौंदर्यीकरणाची कामेही केली जाणार आहेत. आवश्यकतेनुसार सेवा वाहिन्यांचे स्थलांतर तसेच भूसंपादनाचा खर्चही प्रकल्पात समाविष्ट करण्यात आला आहे. रस्ता सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वन व पर्यावरण विभागासह संबंधित विभागांच्या आवश्यक परवानग्या घेणे बंधनकारक राहणार आहे. पुलांच्या आराखड्यांना सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी घेण्याबरोबरच बांधकामादरम्यान इंडियन रोड काँग्रेसच्या सुरक्षा मानकांचे पालन करावे लागणार आहे. प्रकल्पाची निविदा प्रक्रिया तातडीने राबविण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. मात्र, आवश्यक भूसंपादन पूर्ण करून जमीन ताब्यात आल्यानंतरच प्रत्यक्ष काम सुरू करण्याची अट घालण्यात आली आहे.

# कोल्हापुरातील ३,८३३ शेतकऱ्यांना कर्जमाफी; दुसरी यादी जाहीर

**कोल्हापूर (प्रथमेश चव्हाण) :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेच्या दुसऱ्या यादीत जिल्ह्यातील ३,८३३ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. यामध्ये कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २,१६०, तर राष्ट्रीयीकृत बँकांमधील १,६७३ शेतकऱ्यांचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत जिल्ह्यातील एकूण ३०,८३० शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. योजनेची दुसरी यादी शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आली. शासनाच्या पोर्टलवर जिल्ह्यातील एकूण ४१,५५२ बँक खात्यांची माहिती अपलोड करण्यात आली होती. त्यापैकी २५ जुलै रोजी पहिली यादी जाहीर करण्यात आली होती. या पहिल्या यादीत २६,९९७ शेतकऱ्यांचा समावेश होता. दुसऱ्या यादीतील ३,८३३ लाभार्थ्यांपैकी जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या २,१६० शेतकऱ्यांना सुमारे १४ कोटी ६२ लाख रुपयांची कर्जमाफी मिळाली आहे. उर्वरित १,६७३ शेतकरी राष्ट्रीयीकृत बँकांशी संबंधित आहेत. जिल्हा उपनिबंधक नीलकंठ करे यांनी यादीत नाव असलेल्या शेतकऱ्यांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. ज्या लाभार्थ्यांनी अद्याप आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण केलेली नाही, त्यांनी ती प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे त्यांनी सांगितले. योजनेच्या पहिल्या यादीत समाविष्ट २६,९९७ शेतकऱ्यांपैकी २१,३८८ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे. मात्र, अजूनही ५,६०९ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण बाकी आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी विलंब न करता आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# शिक्षकेतर भरती प्रक्रिया ऑनलाइन; 'नॉन-टीचिंग पोर्टल'वरून मिळणार वैयक्तिक मान्यता

**पुणे (अभिजीत येरल्लू) :** राज्यातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेला आता वेग येण्याची शक्यता आहे. कनिष्ठ लिपिक, पूर्णवेळ ग्रंथपाल आणि प्रयोगशाळा सहाय्यक या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांना वैयक्तिक मान्यता देण्यासाठी स्वतंत्र 'नॉन-टीचिंग वैयक्तिक मान्यता पोर्टल' तयार करण्यात आले आहे. शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी संबंधित नियुक्त्या तसेच शालार्थसंबंधी कार्यवाही याच पोर्टलवरून करण्याचे निर्देश दिले आहेत. राज्यातील मान्यताप्राप्त खासगी अंशतः आणि पूर्णतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील रिक्त शिक्षकेतर पदे भरण्याला शासनाने ११ ऑगस्ट २०२६च्या निर्णयानुसार मान्यता दिली आहे. मात्र, भरतीपूर्वी पदोन्नती आणि अनुकंपा नियुक्तीला प्राधान्य देणे बंधनकारक करण्यात आले आहे. या दोन्ही प्रक्रियांनंतरही पदे रिक्त राहिल्यास संचमान्यतेनुसार



निश्चित रिक्त पदांपैकी ८० टक्के पदे सरळसेवेने भरता येणार आहेत. सरळसेवा भरती करणाऱ्या संस्थांना प्रथम अद्ययावत बिंदुनामावली तपासून घ्यावी लागणार आहे. त्यानंतर जाहिरातीचे प्रारूप तयार करून संबंधित शिक्षणाधिकारी किंवा विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे प्रस्ताव सादर करावा लागेल. भरतीची जाहिरात स्थानिक आणि राज्यस्तरीय वृत्तपत्रांसह संस्थेच्या संकेतस्थळावर तसेच शाळेच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करणे आवश्यक राहणार आहे. अर्ज प्रक्रिया, छाननी, मुलाखत आणि अंतिम निवडीसाठी किमान तीन महिन्यांचा कालावधी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे, तर मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे राहणार आहे. नियुक्तीच्या सुरुवातीच्या तीन वर्षांचा कालावधी मानधनावर असणार आहे. तसेच उमेदवारांच्या मुलाखतीचे इन-कॅमेरा चित्रीकरण करून त्याची नोंद संस्थेला जतन करावी लागणार आहे. दि. २८ मे २०२५पूर्वी झालेल्या नियुक्त्यांची वैयक्तिक मान्यता आणि शालार्थसंबंधी कार्यवाहीही याच पोर्टलवरून करावी लागणार आहे.

# शिर्डी मंदिरासाठी 'सीआयएसएफ' तैनात होणार? मुंबई उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण आदेश


**छत्रपती संभाजीनगर (नितीन देवळेकर) :** शिर्डी येथील श्री साईबाबा मंदिर आणि परिसराची सुरक्षा अधिक मजबूत करण्याच्या मागणीला आता न्यायालयीन पातळीवर वेग आला आहे. मंदिर परिसरात वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय राखीव पोलीस बल (सीआरपीएफ) किंवा केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल (सीआयएसएफ) यांच्यामार्फत सुरक्षा व्यवस्था पुरविण्याच्या मागणीसाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी शुक्रवारी सुनावणी झाली. कोपरगाव येथील सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी साईभक्तांची सुरक्षा अधिक मजबूत करण्याच्या मागणीसाठी ॲड. सतीश तळेकर यांच्यामार्फत ही जनहित याचिका दाखल केली आहे. शिर्डीतील वाढते गुन्हेगारीचे प्रमाण लक्षात घेता साईबाबा मंदिर आणि परिसराला केंद्रीय सुरक्षा यंत्रणांचे सुरक्षा कवच देण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. दरम्यान, शिर्डी साईबाबा संस्थानच्या बैठकीत मंदिराच्या सुरक्षेसाठी सीआयएसएफची सुरक्षा लागू करण्याबाबत ठराव मंजूर करण्यात आला होता. त्यानुसार संस्थानने सप्टेंबर २०२५ मध्ये सीआयएसएफच्या महासंचालकांना पत्र पाठवून सीआयएसएफची सुरक्षा घेण्यास संस्थान तयार असल्याचे कळविले होते. तसेच याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र, संस्थानच्या या पत्रावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने याचिकाकर्ते संजय काळे यांनी जनहित याचिकेत दिवाणी अर्ज दाखल करून संस्थानच्या पत्राच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी केली. या अर्जावर शुक्रवारी झालेल्या सुनावणीनंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. किशोर संत आणि न्या. जितेंद्र जैन यांनी सीआयएसएफच्या महासंचालकांना संस्थानने पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने आठ आठवड्यांत योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाकडून साधारणपणे विमानतळ, बंदरे, औद्योगिक प्रकल्प, अणुऊर्जा केंद्रे, सरकारी कार्यालये आदी महत्त्वाच्या ठिकाणांच्या सुरक्षेची जबाबदारी पार पाडली जाते. त्यामुळे खंडपीठाच्या निर्देशानंतर शिर्डी साई मंदिराच्या सुरक्षेबाबत सीआयएसएफचे अधिकारी कोणता निर्णय घेतात, याकडे आता लक्ष लागले आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. प्रज्ञा तळेकर, ॲड. अजिंक्य काळे आणि ॲड. उमाकांत औटे यांनी, तर केंद्र शासनाच्या वतीने ॲड. रोहित सर्वज्ञ यांनी काम पाहिले.

# सातारा जिल्हा परिषदेत ३३४ प्राथमिक शिक्षकांना नियुक्ती आदेश

**सातारा (अकिल शेख) :** जिल्हा परिषदेमध्ये पवित्र पोर्टलमार्फत निवड झालेल्या सुमारे ३३४ प्राथमिक शिक्षकांना जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडून नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. शिक्षकांच्या शाळांवर हजर होण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, मंगळवारपर्यंत जवळपास सर्व शिक्षक शाळांवर रुजू होतील, अशी माहिती शिक्षण सभापती तेजस्विनी कदम यांनी दिली. जिल्हा परिषदेंतर्गत पवित्र पोर्टलवर शिक्षक भरतीसाठी सुमारे ५२० रिक्त पदांचा अहवाल सादर करण्यात आला होता. त्यापैकी पहिल्या टप्प्यात ३५७ शिक्षकांची निवड यादी प्राप्त झाली होती. भरती प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने पडताळणी समिती स्थापन केली होती. शिक्षक भरतीची प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण बहुउद्देशीय सभागृहात पार पडली. मात्र, कोणत्या तालुक्यात नवीन शिक्षकांची पदस्थापना करायची, यावरून पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांमध्ये मतभेद निर्माण झाले होते. त्यामुळे ऐन पावसाळ्यात जिल्हा परिषदेत वातावरण तापले होते. दरम्यान, काही मुद्द्यांवर पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांमध्ये पुन्हा चर्चा झाल्यानंतर शिक्षकांच्या पदस्थापनेची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यानंतर प्राथमिक शिक्षण विभागामार्फत सुमारे २०२ उपशिक्षक आणि १३२ पदवीधर शिक्षक, अशा एकूण ३३४ शिक्षकांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. नियुक्तीपत्रे मिळाल्यानंतर सर्व शिक्षक शनिवारपासून संबंधित शाळांमध्ये हजर होण्यास सुरुवात झाली आहे. उर्वरित शिक्षकही मंगळवारपर्यंत शाळांवर रुजू होतील, अशी माहिती शिक्षण सभापती तेजस्विनी कदम यांनी दिली.

# श्री हटाळेश्वर मंदिराचे तळे दुर्लक्षित; शौचालय व सांडपाणी थेट तळ्यात

**रायगड (धनश्री सट्टा) :** एकेकाळी पाली शहराच्या वैभवात भर घालणारे आणि श्री हटाळेश्वर मंदिर परिसराचे सौंदर्य खुलविणारे तळे आज प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अक्षरशः कचराकुंडी बनले आहे. तळ्याच्या काठावरील घरांमधील शौचालयाचे पाणी, सांडपाणी तसेच कचरा थेट तळ्यात जात असल्याने पाण्याचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण झाले आहे. त्यामुळे ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेल्या या परिसराची अवस्था अत्यंत विदारक झाली आहे. पूर्वीच्या काळात पाली शहरात नळपाणीपुरवठ्याची सुविधा उपलब्ध नव्हती. त्यावेळी गावातील तलाव, तळी आणि विहिरी हे नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा आधार होते. पिण्याचे पाणी, घरगुती वापर, जनावरांसाठी पाणी तसेच इतर अनेक गरजांसाठी या जलस्रोतांवर नागरिक अवलंबून असत. त्यामुळे गावातील तलाव केवळ पाण्याचे स्रोत नव्हते, तर गावाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग होते. पालीतील श्री हटाळेश्वर मंदिर परिसरातील हे तळेही पूर्वी स्वच्छ आणि निसर्गरम्य असल्याचे ज्येष्ठ नागरिक सांगतात. तळ्याभोवतीचा परिसर हिरवाईने नटलेला असे. मंदिरात येणाऱ्या भाविकांसोबतच नागरिकांसाठीही हा परिसर आकर्षणाचे ठिकाण होता. मात्र कालांतराने शहराचा विस्तार झाला, तळ्याच्या एका बाजूला घरे व दुकाने उभी राहिली आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचा प्रश्न गंभीर बनत गेला. आज परिस्थिती अशी आहे की,



काही घरांचे शौचालयाचे पाणी आणि सांडपाणी थेट तळ्यात सोडले जात असल्याचे चित्र दिसत आहे. त्यातच कचऱ्याची भर पडत असल्याने तळ्याचे पाणी प्रदूषित झाले आहे. दुर्गंधी, अस्वच्छता आणि वाढलेली जलपर्णी यामुळे मंदिर परिसरात येणाऱ्या नागरिकांना व भाविकांना त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे या परिस्थितीची माहिती संबंधित प्रशासन आणि लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचवूनही प्रश्न कायम असल्याची नागरिकांची नाराजी आहे. या तळ्याचा सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी गाळ काढण्यात आला होता, अशी माहिती येथील ज्येष्ठ नागरिकांकडून मिळते. त्यानंतर तळ्याची नियमित देखभाल, गाळ काढणे आणि परिसराचे नियोजनबद्ध संवर्धन झाले नसल्याने तळ्याची पाणी साठवण क्षमता आणि नैसर्गिक सौंदर्य दोन्हीवर परिणाम झाला आहे. गावातील जलस्रोतांचे संवर्धन करणे ही केवळ सौंदर्याची बाब नसून भविष्यातील पाणी व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही महत्त्वाची बाब आहे. पूर्वी गावांच्या रचनेत तलावांना विशेष स्थान दिले जात असे. पावसाचे पाणी साठवणे, भूजलपातळी टिकवणे आणि परिसरातील पर्यावरणीय समतोल राखणे यामध्ये तलावांची भूमिका महत्त्वाची होती. मात्र आधुनिक विकासाच्या ओघात अनेक ठिकाणी या पारंपरिक जलस्रोतांकडे दुर्लक्ष झाले आहे. श्री हटाळेश्वर मंदिराच्या या ऐतिहासिक तळ्याला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी जिल्हा परिषद सदस्या शर्मिला बोडके यांनी नगरपंचायतीकडे निवेदन सादर केले आहे. तळ्याचे गाळ काढणे, स्वच्छता करणे आणि परिसराचे सुशोभीकरण करण्याबाबत त्यांनी पुढाकार घेतला आहे. पाली नगरपंचायतीकडून सध्या मधली आळी येथील तळ्याचा गाळ काढणे आणि सुशोभीकरणाचे काम करण्यात येत आहे. त्याच धर्तीवर श्री हटाळेश्वर मंदिराच्या तळ्याचाही विकास करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. श्री हटाळेश्वर मंदिराच्या तळ्याचे केवळ गाळ काढून भागणार नाही. तळ्याच्या चारही बाजूंना संरक्षक भिंत उभारणे, सांडपाणी तळ्यात जाणार नाही यासाठी स्वतंत्र निचरा व्यवस्था करणे, कचरा टाकण्यास प्रतिबंध करणे, नियमित स्वच्छता करणे तसेच परिसरात सुशोभीकरण करणे आवश्यक आहे. नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था, हिरवळ आणि सुरक्षित पादचारी मार्ग उभारल्यास मंदिर परिसराला नवे रूप मिळू शकते. विशेषतः वयस्कर नागरिक, लहान मुले आणि भाविकांना या परिसरात काही वेळ शांतपणे बसता यावे, यासाठी नियोजनबद्ध विकासाची गरज आहे. नगरपंचायतीच्या निधीसोबतच आमदार, खासदार अथवा अन्य उपलब्ध विकास निधीतून या कामाला चालना मिळू शकते. श्री हटाळेश्वर मंदिराला धार्मिक महत्त्व आहे. हिंदू धर्मपरंपरेत भगवान शंकरांना पवित्रता, निसर्ग आणि जलतत्त्वाशी जोडले गेले आहे. अशा पवित्र मंदिराच्या परिसरातील जलस्रोतच जर सांडपाणी आणि कचऱ्यामुळे प्रदूषित होत असेल, तर ही बाब निश्चितच गांभीर्याने घेण्याची गरज आहे. श्रद्धा जपण्याबरोबरच मंदिर परिसरातील पर्यावरण आणि स्वच्छताही जपली गेली पाहिजे. एकेकाळी पालीच्या सौंदर्यात भर घालणारे हे तळे आज अस्वच्छतेच्या विळख्यात सापडले आहे.ग्रामपंचायती पासून नगरपंचायती पर्यंतच्या प्रशासनाच्या काळात हा प्रश्न कायम राहिला आहे.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**दक्षिण मुंबई (विद्युत) सा.बां.विभाग, मुंबई**
**बांधकाम भवन, १ ला मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-०१.**

**मेल पत्ता :-** elsouthmumbai.ee@mahapwd.gov.in **दूरध्वनी क्रमांक-०२२-२२००८४४८**

**ई निविदा सुचना क्र. १९ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता दक्षिण मुंबई (विद्युत) विभाग, सा.बां.विभाग, मुंबई फोर्ट, मुंबई, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून विद्युत अनुज्ञापतीधाकर कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता प्रारुप बी-१ नमून्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कादपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग मुंबई यांना राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारण्यात येणार नाही.

**कामाचे नाव :१)** १) अंदाजपत्रक क्र. सीआर / मंत्रालय / एमएस / १००६ / २०२६-२७: मंत्रालय, मुंबई येथील ॲनेक्स इमारतीत बसविण्यात आलेल्या 'मित्सुबिशी इलेक्ट्रिक' (Mitsubishi Electric) कंपनीच्या VRV प्रकारच्या वातानुकूलन प्रणालीसाठी (एकूण क्षमता: 121 नग x 20 HP = 2420 HP) आणि त्यासंबंधीच्या विद्युत यंत्रणेसाठी पूर्णतः सर्वसमावेशक वार्षिक देखभाल करार (Comprehensive AMC) उपलब्ध करून देणे.

**अंदाजित किंमत रुपये :** ७६६९२२६४/- (सात कोटी सहासष्ठ लक्ष ब्यानव हजार दोनशे चौसष्ठ फक्त )

**ई- निविदा पुर्व बैठक वेळ व ठिकाण:-** दिनांक १५.०९.२०२६ रोजी दुपारी १४ : ३० वाजता मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, चौथा मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई.

**कामाचे नाव : २)** अंदाजपत्रक क्र. सीआर / मंत्रालय / एमएस / १०२० / २०२६-२७: **मंत्रालय, मुंबई येथील मुख्य** इमारतीत बसविण्यात आलेल्या 'नेटवर्क स्ट्रक्चर्ड बॅकबोन केबलिंग सिस्टीम'ची संपूर्ण देखभाल आणि संचालन (fully comprehensive maintenance and operations) करणे.

**अंदाजित किंमत रुपये :** ३३०५६२८०/- (तीन कोटी तीस लक्ष छप्पन हजार दोनशे ऐंशी फक्त )

**ई- निविदा पुर्व बैठक वेळ व ठिकाण:-** दिनांक १५.०९.२०२६ रोजी दुपारी १५:०० वाजता मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, चौथा मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई.

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :** दिनांक ०९.०९.२०२६ दुपारनंतर १७:०० पासून ते दिनांक १७.०९.२०२६ रोजी १७:०० वाजेपर्यंत

**ई-निविदा उघडणे व ठिकाण :** दिनांक १८.०९.२०२६ रोजी दुपारनंतर १७:०० वाजता अधीक्षक अभियंता (वि), मुंबई प्रादेशिक विदयुत मंडळ, सा.बां. विभाग मुंबई.

सविस्तर माहिती खालील प्रमाणे उपलब्ध आहे.

१. **https://mahatenders.gov.in**
**(सदर निविदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)**

२. कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई (विद्युत) विभाग, सा.बां.विभाग, मुंबई फोर्ट, मुंबई, कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.-काअ/दमुविवि/नि.लि./**४९१६**/२०२६-२७
दिनांक :-**०४.०९.२०२६**

कार्यकारी अभियंता
दक्षिण मुंबई विदयुत विभाग
सा. बां. विभाग, मुंबई

आरओसी - 2026-27/क्र-5/C२६९६

# ‘हनुमान अंश’चा बॉक्स ऑफिसवर जलवा कायम; ‘हैवान’ला मात्र दमदार सुरुवातीची प्रतीक्षा

**वृत्तसंस्था :** बॉक्स ऑफिसवर सध्या ‘हनुमान अंश’ आणि अक्षय कुमार-सैफ अली खान यांचा ‘हैवान’ हे चित्रपट चर्चेत आहेत. एकीकडे नीम करोली बाबांच्या जीवनावर आधारित ‘हनुमान अंश’ प्रदर्शनाच्या पाच आठवड्यांनंतरही प्रेक्षकांना आकर्षित करत असून, दुसरीकडे ११ सप्टेंबरला प्रदर्शित झालेल्या ‘हैवान’कडून वीकेंडमध्ये कमाई वाढण्याची अपेक्षा आहे. मोठ्या स्टारकास्टनंतरही ‘हैवान’ला पहिल्या दिवशी अपेक्षित मोठी ओपनिंग मिळालेली नाही. ‘हनुमान अंश’ने सुरुवातीला फार मोठी कमाई केली नसली तरी प्रेक्षकांकडून मिळालेल्या प्रतिसादामुळे चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर आपली पकड मजबूत केली. धार्मिक आणि अध्यात्मिक विषयावर आधारित या चित्रपटाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. विशेष म्हणजे प्रदर्शनाचा एक महिना पूर्ण झाल्यानंतरही चित्रपटाच्या कमाईचा वेग कायम आहे. उपलब्ध बॉक्स ऑफिस आकडेवारीनुसार, चित्रपटाने




आपल्या ३६व्या दिवशी सुमारे १०.५० कोटी रुपयांची नेट कमाई केली. त्याची भारतातील एकूण नेट कमाई १७३.६३ कोटी रुपये, तर ग्रॉस कमाई सुमारे २०५.१५ कोटी रुपये झाल्याचे सांगण्यात येत आहे. सहाव्या आठवड्यातही एवढी कमाई करणे निर्मात्यांसाठी मोठे यश मानले जात आहे. अक्षय कुमार आणि सैफ अली खान यांच्या प्रमुख भूमिका असलेला ‘हैवान’ हा क्राइम थ्रिलर चित्रपट ११ सप्टेंबरला प्रदर्शित झाला. प्रियदर्शन दिग्दर्शित या चित्रपटाकडून प्रेक्षक आणि चित्रपटसृष्टीला मोठ्या अपेक्षा होत्या. विशेष म्हणजे अक्षय आणि सैफ ही जोडी अनेक वर्षांनंतर पुन्हा पडद्यावर एकत्र आली आहे. मात्र, पहिल्या दिवसाचे आकडे अपेक्षेइतके समाधानकारक ठरले नाहीत. उपलब्ध ट्रेड रिपोर्टनुसार,




‘हैवान’ने भारतात पहिल्या दिवशी सुमारे २.५ ते ३ कोटी रुपयांच्या आसपास नेट कमाई केल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे मोठ्या बजेटचा आणि मोठ्या कलाकारांचा चित्रपट असूनही सुरुवातीला बॉक्स ऑफिसवर संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र आहे. सध्या बॉक्स ऑफिसवर अनेक चित्रपटांमध्ये प्रेक्षकांचे लक्ष विभागले गेले आहे. ‘हनुमान अंश’ची सुरू असलेली घोडदौड आणि ‘मिर्झापूर द मूवी’ची चर्चा यामुळे ‘हैवान’समोर सुरुवातीपासूनच स्पर्धेचे आव्हान आहे. मात्र, चित्रपटांच्या कमाईत शनिवार आणि रविवारचा काळ अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे ‘हैवान’च्या कमाईत वीकेंडला किती वाढ होते, याकडे व्यापार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. ‘हैवान’ला टिकून राहण्यासाठी पुढील काही दिवसांत कमाईचा वेग वाढवणे आवश्यक आहे. चांगला प्रेक्षक प्रतिसाद मिळाल्यास चित्रपटाच्या कमाईत मोठी झेप घेण्याची शक्यता आहे. दुसरीकडे ‘हनुमान अंश’ने आपल्या विषयाच्या जोरावर बॉक्स ऑफिसवर दीर्घकाळ टिकण्याची क्षमता दाखवली आहे. मोठ्या स्टार्सचा चित्रपट आणि अध्यात्मिक विषयावर आधारित चित्रपट यांच्यातील ही बॉक्स ऑफिस स्पर्धा सध्या लक्षवेधी ठरत आहे. आता आगामी दिवसांत ‘हैवान’ जोरदार कमबॅक करतो की ‘हनुमान अंश’चा दबदबा कायम राहतो, हे पाहणे मनोरंजक ठरणार आहे.

# ‘मराठे’ आडनाव खूप मराठी वाटतं म्हणून नाव बदललं; श्रुती मराठेने सांगितला जुना किस्सा

**वृत्तसंस्था :** अभिनेत्री श्रुती मराठेने मराठी चित्रपट आणि मालिकांसोबतच दाक्षिणात्य सिनेमातही आपल्या अभिनयाची छाप पाडली आहे. सध्या ती तेलुगू चित्रपटांमध्येही काम करत आहे. मात्र दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत पदार्पण करताना तिने आपल्या नावात बदल केला होता, असा खुलासा श्रुतीने नुकत्याच एका मुलाखतीत केला. श्रुतीने सांगितले की, तिने २००९ मध्ये पहिल्या तमिळ चित्रपटात काम केले होते. त्या काळात दक्षिण आणि हिंदी-मराठीसह उत्तर भारतातील चित्रपटसृष्टी यांच्यात आजच्या तुलनेत फारसा संवाद नव्हता. ओटीटीच्या विस्तारामुळे आता विविध भाषांमधील सिनेमे आणि कलाकार प्रेक्षकांपर्यंत सहज पोहोचतात; मात्र त्यावेळी परिस्थिती वेगळी होती. पहिल्या तमिळ चित्रपटाच्या वेळी निर्मात्यांना तिचे ‘मराठे’ हे आडनाव खूपच मराठी वाटत असल्याचे श्रुतीने सांगितले. दाक्षिणात्य चित्रपटात काम करताना तिचे नाव थोडे दक्षिण भारतीय वाटावे, अशी त्यांची इच्छा होती. त्यावेळी श्रुती नवखी असल्यामुळे तिने या बदलाला होकार दिला.



तिच्या वडिलांचे नाव ‘प्रकाश’ असल्याने तिचे नाव ‘श्रुती प्रकाश’ असे करण्यात आले. त्यानंतर तिने दक्षिणेतील तीन-चार चित्रपट याच नावाने केले. मात्र काही काळानंतर तिने दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतून ब्रेक घेतला आणि मराठी मनोरंजनविश्वात पुनरागमन केले. ‘राधा ही बावरी’ या मालिकेतही तिने काम केले. यानंतर पुन्हा दाक्षिणात्य सिनेमात काम करण्याची संधी मिळाल्यावर मात्र तिने स्वतःचे मूळ नाव कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. ‘देवरा’ या चित्रपटात ती ‘श्रुती मराठे’ या नावाने झळकली. सध्या ती दोन तेलुगू चित्रपटांमध्ये काम करत असून, त्यातही ‘श्रुती मराठे’ हेच नाव वापरत असल्याचे तिने सांगितले. श्रुतीच्या या खुलाशामुळे तिच्या चाहत्यांना तिच्या नावामागची ही रंजक गोष्ट समोर आली आहे. सुरुवातीला करिअरमध्ये संधी मिळवण्यासाठी केलेला नावातील बदल नंतर तिने स्वतःच्या ओळखीशी जोडलेले मूळ आडनाव कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. आज मराठी अभिनेत्री म्हणून तिची ओळख दाक्षिणात्य प्रेक्षकांमध्येही निर्माण होत आहे.

# वैभव सूर्यवंशीसारखे युवा खेळाडू घडवा; वासिम अक्रम यांचा पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला सल्ला






**वृत्तसंस्था :** पाकिस्तान क्रिकेटमध्ये सध्या सुरू असलेल्या घडामोडींवर माजी कर्णधार आणि महान वेगवान गोलंदाज वासिम अक्रम यांनी परखड मत व्यक्त केले आहे. पाकिस्तान क्रिकेटला पुन्हा मजबूत करायचे असेल, तर देशातील युवा प्रतिभा शोधून त्यांना योग्य प्रशिक्षण आणि संधी देण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. भारताचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याचे उदाहरण देत अक्रम यांनी पाकिस्तानमध्ये अशाच प्रकारच्या प्रतिभावान खेळाडूंची निर्मिती करण्यावर भर दिला. अक्रम यांच्या मते, पाकिस्तान सुपर लीगला दहा वर्षे पूर्ण झाली असली तरी या स्पर्धेतून पाकिस्तानला एकही असा दर्जेदार फलंदाज मिळालेला नाही, ज्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सातत्याने मोठी छाप पाडली आहे. या स्पर्धेने काही चांगले गोलंदाज नक्कीच दिले आहेत; मात्र फलंदाजांच्या बाबतीत अपेक्षित यश मिळालेले नाही. त्यामुळे केवळ मोठ्या स्पर्धा आयोजित करण्यापेक्षा त्यामागे मजबूत टॅलेंट स्काऊटिंग व्यवस्था उभारणे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. “वैभवसारख्या प्रतिभाशाली खेळाडूंची गुणवत्ता योग्य वेळी ओळखून त्यांना बहरण्यासाठी मदत केली, तरच चांगले क्रिकेटपटू घडू शकतील,” असा मुद्दा अक्रम यांनी मांडला. पाकिस्तानच्या कानाकोपऱ्यात खेळणाऱ्या युवा क्रिकेटपटूंचा शोध घेण्यासाठी प्रशिक्षित आणि शिस्तबद्ध टॅलेंट स्काऊटची यंत्रणा तयार करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. वैभव सूर्यवंशीने कमी वयातच क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतले आहे. त्याच्या आक्रमक फलंदाजीची चर्चा होत असून, अनुभवी गोलंदाजांविरुद्ध आत्मविश्वासाने फटकेबाजी करण्याची त्याची क्षमता विशेष ठरली आहे. त्यामुळे अक्रम यांनी त्याचा आदर्श म्हणून उल्लेख केला. पाकिस्तानच्या कसोटी क्रिकेटच्या कामगिरीबाबतही अक्रम यांनी महत्त्वाचे मत मांडले. कसोटी क्रिकेटमध्ये सुधारणा करायची असेल, तर क्लब क्रिकेटचा दर्जा उंचावणे हा मूलभूत उपाय असल्याचे त्यांनी सांगितले. कराची आणि लाहोरसारख्या क्रिकेटच्या केंद्रांमध्ये पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने मोठी गुंतवणूक करावी, जेणेकरून स्थानिक पातळीवरून दर्जेदार खेळाडू पुढे येतील, असे त्यांनी सुचवले. दरम्यान, इंग्लंड दौऱ्यावर पाकिस्तान संघाची कामगिरी निराशाजनक ठरली आहे. दोन कसोटी सामने गमावल्यानंतर संघव्यवस्थापन आणि निवड प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. दुसऱ्या कसोटीनंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने सात खेळाडू आणि दोन प्रशिक्षकांना मायदेशी पाठवण्याचा निर्णय घेतला. तसेच सईम अयुबला कॅरेबियन प्रीमियर लीगमधून इंग्लंडमध्ये बोलावण्यात आले. अचानक मोठ्या प्रमाणावर संघात बदल करून कामगिरीत सुधारणा होईल का, असा प्रश्न क्रिकेट चाहत्यांकडून उपस्थित केला जात आहे.

# कतरिनाच्या डान्सचा प्रवास: ‘शिला की जवानी’पूर्वी मिळाली होती कठोर टीका

**वृत्तसंस्था :** अभिनेत्री कतरिना कैफ आज बॉलीवूडमधील लोकप्रिय आणि दमदार डान्स परफॉर्मन्ससाठी ओळखली जाते. ‘शिला की जवानी’, ‘चिकनी चमेली’ आणि ‘काला चश्मा’ यांसारख्या गाण्यांमधून तिने आपल्या डान्सची वेगळी ओळख निर्माण केली. मात्र, या यशापर्यंत पोहोचण्याचा तिचा प्रवास तितका सोपा नव्हता. करिअरच्या सुरुवातीच्या काळात कतरिनाला डान्स येत नसल्याची टीका सहन करावी लागली होती. प्रसिद्ध कोरिओग्राफर बॉस्को मार्टिस यांनी नुकताच हा जुना किस्सा सांगितला आहे. बॉस्को आणि सीझर या प्रसिद्ध कोरिओग्राफर जोडीच्या पॉडकास्टमध्ये फराह खान सहभागी झाली होती. यावेळी कतरिनाच्या डान्स प्रवासावर चर्चा झाली. बॉस्को यांनी सांगितले की, कतरिनाने बॉलीवूडमध्ये सुरुवात केली तेव्हा एका कोरिओग्राफरकडून तिच्यावर टीका करण्यात आली होती. त्या कोरिओग्राफरने कतरिनाला “तुला डान्स अजिबात येत नाही, त्यामुळे हे सोडून दिले पाहिजे,” असे सांगितल्याचा दावा बॉस्को यांनी केला. मात्र, या व्यक्तीचे नाव त्यांनी उघड केले नाही. या प्रसंगामुळे कतरिनाच्या आत्मविश्वासाला मोठा धक्का बसला होता. एखाद्या कलाकाराला सुरुवातीच्या काळात मिळणारी टीका त्याच्या करिअरवर आणि मानसिकतेवर परिणाम करू शकते.




कतरिनाच्या बाबतीतही काही काळ अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. कतरिनाबद्दलचा हा किस्सा ऐकल्यानंतर फराह खानने तिच्या मेहनतीचे कौतुक केले. फराहच्या मते, कतरिनाने सुरुवातीच्या काळातील मर्यादा स्वीकारून त्यावर सातत्याने काम केले. ‘शिला की जवानी’नंतर तिच्या डान्समध्ये मोठा बदल जाणवला, असे फराहने सांगितले. यानंतर कतरिनाने ‘चिकनी चमेली’ आणि ‘काला चश्मा’ यांसारख्या गाण्यांमधूनही प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. तिच्या डान्समध्ये केवळ स्टेप्स नव्हे, तर आत्मविश्वास, बॉडी लँग्वेज आणि स्क्रीन प्रेझेन्समध्येही मोठी सुधारणा झाल्याचे दिसून आले. कतरिनानेही यापूर्वी एका मुलाखतीत आपल्या डान्स प्रवासातील संघर्षाबद्दल भाष्य केले होते. तिला एकदा थेट “तुला डान्स करता येत नाही” असे सांगण्यात आले होते. या टीकेचा तिच्या आत्मविश्वासावर परिणाम



झाला आणि आपण कधीही चांगली डान्सर होऊ शकणार नाही, असे तिला वाटू लागले होते. मात्र, बॉस्को यांनी तिच्या विचार करण्याच्या पद्धतीत बदल घडवून आणला. त्यांनी कतरिनाला ती चांगली डान्सर होऊ शकते, फक्त अधिक मेहनत आणि सरावाची गरज आहे, असे सांगितल्याचे कतरिनाने नमूद केले होते. त्यांच्या प्रोत्साहनामुळे तिला स्वतःवर विश्वास ठेवण्यास मदत झाली. फराह खानने ‘शिला की जवानी’च्या निर्मितीचा अनुभवही सांगितला. हे गाणे तिने कोरिओग्राफ केलेल्या गाण्यांपैकी तुलनेने कमी खर्चात तयार झालेल्या गाण्यांपैकी एक असल्याचे तिने सांगितले. या गाण्यात कतरिनासोबत केवळ १० पुरुष डान्सर्स होते. गाण्याची संकल्पना, कतरिनाचा आत्मविश्वास आणि तिच्या डान्समधील ऊर्जा यामुळे ‘शिला की जवानी’ प्रचंड लोकप्रिय झाले. बॉस्को आणि सीझर यांनीही हे गाणे कतरिनाच्या करिअरसाठी गेमचेंजर ठरल्याचे मान्य केले. कतरिनाचा हा प्रवास एका महत्त्वाच्या गोष्टीकडे लक्ष वेधतो—सुरुवातीची टीका ही अंतिम सत्य नसते. सातत्याने मेहनत, योग्य मार्गदर्शन आणि स्वतःवरचा विश्वास असेल तर कमतरता कौशल्यात बदलता येते. कतरिनाने आपल्या डान्सच्या माध्यमातून हेच सिद्ध केले आहे. आज तिच्या डान्स गाण्यांना मिळणारी लोकप्रियता पाहता, करिअरच्या सुरुवातीला झालेली टीका तिच्या प्रवासातील केवळ एक कठीण टप्पा ठरली आहे.

# झोपताना बेडरूममध्ये प्रकाश ठेवणे धोकादायक? संशोधनात हृदयाच्या आरोग्याबाबत गंभीर इशारा

**वृत्तसंस्था :** रात्री झोपताना बेडरूममध्ये मंद प्रकाश ठेवण्याची सवय असेल, तर ती आरोग्यासाठी कितपत योग्य आहे, याचा विचार करण्याची गरज आहे. नवीन संशोधनानुसार, रात्रीच्या वेळी प्रकाशाच्या संपर्कात राहण्याचा संबंध हृदयाच्या रचनेत आणि कार्यक्षमतेत होणाऱ्या बदलांशी आढळला आहे. विशेषतः झोपताना मोबाईलची स्क्रीन, एलईडी दिवे किंवा बाहेरून येणारा प्रकाश याकडे दुर्लक्ष करू नये, असे संशोधनातून सूचित होते. ‘युरोपियन हार्ट जर्नल’मध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासात रात्रीच्या प्रकाशाच्या संपर्काचा हृदयाच्या आरोग्यावर होणारा परिणाम तपासण्यात आला. संशोधकांच्या मते, रात्री जास्त



प्रकाशाच्या संपर्कात राहण्याचा संबंध ‘कार्डियाक रिमॉडेलिंग’शी असू शकतो. या प्रक्रियेत हृदयाच्या रचनेत आणि कार्यप्रणालीत बदल होऊ शकतात. अमेरिकेतील तुलाने युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी केलेल्या या अभ्यासात ११,०७१ व्यक्तींचा समावेश करण्यात आला. सहभागी व्यक्तींना रात्रीच्या वेळी वेगवेगळ्या प्रकाशाच्या परिस्थितीचा अनुभव होता. पूर्ण अंधारापासून ते दाराच्या फटीतून येणारा प्रकाश किंवा मोबाईलच्या मंद स्क्रीनपर्यंत विविध प्रकाशमान परिस्थितींचा विचार करण्यात आला. त्यानंतर तीन वर्षांच्या कालावधीनंतर सहभागींच्या हृदयाची रचना आणि कार्य तपासण्यासाठी ‘कार्डिओव्हस्कुलर मॅग्नेटिक रेझोनन्स’ म्हणजेच सीएमआर स्कॅनचा वापर करण्यात आला. ज्या व्यक्तींना रात्री तुलनेने अधिक प्रकाशाचा सामना करावा लागत होता, त्यांच्या हृदयाच्या डाव्या बाजूच्या कप्प्याच्या भिंती जाड झाल्याचे संकेत संशोधनात दिसून आले. या बदलामुळे हृदयाच्या कप्प्यातील पोकळी कमी होऊ शकते आणि हृदयाच्या स्नायूंची लवचिकता प्रभावित होऊ शकते. परिणामी हृदयाला रक्त पंप करण्याचे काम अधिक आव्हानात्मक होण्याची शक्यता असते. मात्र, या अभ्यासातून प्रकाशामुळे थेट हृदयविकार किंवा हार्ट फेल्युअर होतो, असा निष्कर्ष काढता येत नाही. संशोधनात आढळलेला संबंध पुढील अभ्यासातून अधिक स्पष्ट करणे आवश्यक आहे. तज्ज्ञांच्या मते, झोपेच्या वेळी शक्य तितका अंधार ठेवणे हा साधा आणि उपयोगी उपाय ठरू शकतो. बेडरूममध्ये ब्लॅकआउट पडदे वापरणे, अनावश्यक एलईडी दिवे बंद करणे आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांवरील स्टँडबाय दिवे झाकणे यामुळे रात्रीचा प्रकाश कमी करता येतो. मोबाईल किंवा इतर स्क्रीनचा वापर झोपण्यापूर्वी कमी करणे आणि गरज असल्यास तीव्र पांढऱ्या प्रकाशाऐवजी उबदार रंगाचा मंद प्रकाश वापरणेही उपयुक्त ठरू शकते. विशेषतः रात्रीची शिफ्ट करणाऱ्या व्यक्तींनी झोपेचे वातावरण शक्य तितके अंधारमय ठेवण्याकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),कोंकण भवन,नवी मुंबई.**
दुरध्वनी क्र.- ०२२-२७५७१५३४ e-mail : harbournkb.ee@mahapwd.gov.in

**निविदा सुचना क्र. ०७ सन २०२६-२७**
**ई-निविदा सूचना**

पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),कोंकण भवन,नवी मुंबई ४०० ६१४, योग्य निविदा धारकाकडून (कंत्राटदारांकडून) खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑन लाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकरावण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोकण भवन, नवी मुंबई यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अनु. क्र | कामाचे नाव | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १. | मच्छीमार सर्वोदय सहकारी संस्था लि.कुलाबा येथे उतरता धक्का (रॅम्प) बांधणे | रु. १,९४,२७,९७३/- |

निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी :- दि.११/०९/२०२६ स. ११.३० ते २१/०९/२०२६ दु.१४.०० पर्यंत

निविदा पूर्व बैठक :- दि १६/०९/२०२६ दु.३.०० वा. मा.अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां मंडळ, ५ वा मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

निविदा उघडण्याचा कालावधी :- दि.२२/०९/२०२६ दु.१५.०५ वा.

**टिप- ई- निविदेची संपुर्ण माहिती खाली नमुद केलेल्या संकेत्त स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.**
१. https://mahapwd.gov.in
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल)
३. कार्यालयातील सूचना फलक.

**स्थळ प्रत प.अ.यांनी मान्य केली असे.**

**जा.क्र. पअउ/निविदा/१५०३**
**पत्तन अभियंता यांचे कार्यालय,**
**पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),**
**कोंकण भवन,नवी मुंबई-४०० ६१४.**
**दिनांक -०९/०९/२०२६**

(ए.मु.कचरे)
सहाय्यक पत्तन अभियंता,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ)
कोकण भवन, नवी मुंबई

आरओसी - 2026-27/क्र-5/C२७६२

# महालक्ष्मी मंदिराजवळ गुटख्याची वाहतूक उधळली; ४०.७७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पालघर (विशेष प्रतिनिधी) :** महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या सुगंधी पानमसाल्याची गुजरातमधून भिवंडीच्या दिशेने सुरू असलेली वाहतूक पालघर स्थानिक गुन्हे शाखेने उधळून लावली. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर महालक्ष्मी (विवळवेढे) परिसरात कारवाई करत पोलिसांनी सुमारे २० लाख ७७ हजार ६५२ रुपये किमतीचा प्रतिबंधित विमल पानमसाला जप्त केला. या मालाची वाहतूक करणारा सुमारे २० लाख रुपये किमतीचा आयशर टेम्पोही पोलिसांनी ताब्यात घेतला. या कारवाईत एकूण ४० लाख ७७ हजार ६५२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चालकाला अटक करण्यात आली आहे. बुधवारी, ९ सप्टेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंद्यांविरोधात कारवाईसाठी महामार्गावर गस्त घालत होते. चारोटी टोलनाक्याजवळ



पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, सुरत येथून एका आयशर टेम्पोत प्रतिबंधित पानमसाला भरून तो भिवंडी येथे विक्रीसाठी नेण्यात येत आहे.माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी विवळवेढे गावातील महालक्ष्मी मंदिरासमोर वाहन तपासणी सुरू केली. त्यावेळी संशयास्पदरीत्या येणारा MH-03-ES-1791 क्रमांकाचा आयशर टेम्पो पोलिसांनी अडविला. पंचांच्या उपस्थितीत वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गोण्या आढळून आल्या. तपासणीत या गोण्यांमध्ये विमल पानमसाला आणि केसरयुक्त विमल पानमसाला असल्याचे उघड झाले.पोलिसांनी टेम्पोसह प्रतिबंधित माल ताब्यात घेत त्याची मोजणी व पाहणी केली. जप्त करण्यात आलेल्या पानमसाल्याची किंमत २० लाख ७७ हजार ६५२ रुपये, तर वाहनाची किंमत सुमारे २० लाख रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. सुरतहून भिवंडीला माल रवाना प्राथमिक तपासात सदर प्रतिबंधित पानमसाला गुजरातमधील सुरत परिसरातून भरून भिवंडी येथे विक्रीसाठी नेला जात असल्याची माहिती समोर आली आहे. महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या या पदार्थाची वाहतूक, साठवणूक आणि विक्री केल्याच्या आरोपावरून टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमांसह अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील तरतुदींनुसार कारवाई करण्यात आली असून चालक जाकिर हुसैन अजगरअली चौधरी (वय ५२) याला अटक करण्यात आली आहे. प्रतिबंधित मालाचा पुरवठा नेमका कुठून झाला आणि या व्यवहारामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करीत आहेत.ही कारवाई पालघरचे पोलीस अधीक्षक यतिन देशमुख आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रविंद्र वानखेडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पोलीस अंमलदार नरेश घाटाळ, राकेश पाटील, दिनेश गायकवाड, संजय धांगडा, बजरंग अमनवाड आणि विशाल कडव यांच्या पथकाने कारवाईत सहभाग घेतला. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# ड्रग्ज तस्करीविरोधात कल्याण पोलिसांचा दणका; जालीम गँगवर मोक्का

**कल्याण (विशेष प्रतिनिधी) :** कल्याण परिसरातील कथित संघटित गुन्हेगारीविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. कुख्यात अमजद पठाण याच्यासह त्याच्या साथीदारांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) कारवाई करण्यात आली आहे. ड्रग्ज तस्करीच्या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थ जप्त केल्यानंतर पोलिसांनी ही कठोर पावले उचलली आहेत.काही दिवसांपूर्वी अमजद पठाण, काशिम वसईकर, कृष्णा हालेमणी, गणेश मुथू स्वामी आणि सद्दाम शेख यांना पोलिसांनी अटक केली होती. तपासादरम्यान पोलिसांनी मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ हस्तगत केल्याची माहिती असून, जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जची किंमत सुमारे ३४ कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे.पोलिसांच्या माहितीनुसार, संबंधित टोळी 'जालीम गँग' या नावाने ओळखली जाते. अमजद पठाण याच्यावर ड्रग्ज तस्करीसह हत्या, हत्येचा प्रयत्न, वसुलीचा प्रयत्न, अपहरण यांसारख्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांशी संबंधित आरोप असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. संघटित पद्धतीने गुन्हेगारी कारवाया केल्याच्या पार्श्वभूमीवर टोळीविरोधात मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास कल्याण विभागाचे डीसीपी अतुल झेंडे आणि एसीपी अशोक होनमाने यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.



अमजद पठाणला अटक करण्याच्या कारवाईत डीसीपी स्क्वॉडचे प्रमुख अनिल गायकवाड यांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे पोलिस सूत्रांकडून सांगण्यात आले. अमजद पठाणच्या कारवाईचे वृत्तांकन व चित्रीकरण करत असताना पत्रकारांना धमकावण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेचीही पोलिसांनी गांभीर्याने दखल घेऊन संबंधितांविरोधात स्वतंत्रपणे ठोस कारवाई करावी, अशी मागणी पत्रकार संघटनेने केली आहे. ड्रग्ज तस्करी आणि संघटित गुन्हेगारीविरोधात पोलिसांनी घेतलेल्या या कारवाईमुळे कल्याण परिसरातील गुन्हेगारी टोळ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. मोक्का कारवाईनंतर या प्रकरणातील पुढील तपासात आणखी कोणती माहिती समोर येते, याकडे आता लक्ष लागले आहे.

# कर्ज फेडण्यासाठी तरुणाने एसबीआय लुटली

**नागपुर (विशेष प्रतिनिधी) :** नागपुरात शेअर बाजारातील गुंतवणुकीत झालेला मोठा तोटा भरून काढण्यासाठी एका शिक्षित बेरोजगार युवकाने चक्क बँक लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कर्जाचा बोजा वाढल्यानंतर आरोपीने बँकेतील रोख रकमेवर लक्ष ठेवून लुटीचा कट रचला. कर्मचाऱ्यांच्या डोळ्यांत मिरची पूड फेकून त्याने ४ लाख ५३ हजार रुपयांची रोकड लुटली आणि घटनास्थळावरून पळ काढला. मात्र, पोलिसांनी काही वेळातच त्याचा पाठलाग करून अटक केली. ही घटना सक्करदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भांडे प्लॉट चौक येथील भारतीय स्टेट बँकेच्या शाखेत गुरुवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली. पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव सूरज बोरकर (२८), रा. तातोली, भिवापूर असे आहे. सूरजने बीएससीपर्यंत शिक्षण घेतले असून तो सध्या बेरोजगार असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांच्या प्राथमिक तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. सूरजने शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी सुमारे पाच लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र, बाजारातील गुंतवणुकीत नुकसान झाल्याने त्याच्यावर कर्जाचा मोठा बोजा निर्माण झाला. हे कर्ज फेडण्यासाठी त्याने बँक लुटण्याचा निर्णय घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले. गुरुवारी सायंकाळी सूरज भांडे प्लॉट चौकातील एसबीआय शाखेबाहेर असलेल्या रोख भरणा यंत्रावर लक्ष ठेवून होता. बँकेचे कर्मचारी यंत्रातून रोकड काढून ती शाखेत जमा करण्यासाठी जात असताना त्याने अचानक त्यांच्या मागून मिरची पूड फेकली. मिरची पूड डोळ्यांत गेल्याने कर्मचारी काही क्षण गोंधळले.




याच संधीचा फायदा घेत सूरजने त्यांच्याकडील ४ लाख ५३ हजार रुपयांची रोकड हिसकावली आणि घटनास्थळावरून पळ काढला. या संपूर्ण प्रकाराचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले असून त्याच्या आधारे तपासाला वेग देण्यात आला. घटनेची माहिती मिळताच सक्करदरा पोलिसांनी तातडीने परिसरात नाकाबंदी करून आरोपीचा शोध सुरू केला. मारबत उत्सवाच्या पार्श्वभूमीवर परिसरात पोलिसांची गस्त सुरू असल्याने शोधमोहीम अधिक वेगाने राबवण्यात आली. याचदरम्यान पोलीस कर्मचारी टप्पूलाल चुटे, राजेंद्र मोहोड, शैलेश बेलेकर आणि शरदसिंग टेंभरे यांना एनआयटी उद्यानाजवळ एक संशयित युवक पळताना दिसला. पोलिसांनी त्याचा पाठलाग करून सूरज बोरकरला ताब्यात घेतले. त्याच्याकडून लुटीची संपूर्ण ४ लाख ५३ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. या कटात आणखी कोणी सहभागी होते का, तसेच आरोपीने बँकेची रेकी केली होती का, याचा तपास सक्करदरा पोलीस करीत आहेत.

# सणासुदीआधी FDAची धडक कारवाई; ठाण्यात २०.४८ लाखांचा खाद्यसाठा जप्त

**ठाणे (विशेष प्रतिनिधी) :** सणासुदीच्या काळात खाद्यपदार्थांची मागणी वाढत असताना नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या आस्थापनांवर अन्न व औषध प्रशासनाने (FDA) कारवाईचा बडगा उगारला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे FDAच्या ठाणे विभागाने ९ सप्टेंबर रोजी शिळ-दिवा रोडवरील खडी गाव येथील भास्कर कम्पाऊंड परिसरात छापा टाकला. या कारवाईत फरसाण, वेफर्स, चिवडा आणि नमकीन तयार करणाऱ्या किंवा विक्री करणाऱ्या ११ आस्थापनांची तपासणी करण्यात आली.तपासणीदरम्यान विविध तयार खाद्यपदार्थांसह उत्पादनासाठी वापरण्यात येणारा कच्चा माल मोठ्या प्रमाणात आढळून आला. बटाटा वेफर्स, फराळी चिवडा, तिखा वेफर्स, काळी मिरी वेफर्स, मिक्स फरसाण, शेव, भाकरवडी, चिवडा, डाएट चिवडा, शेजवान स्टिक्स आणि केळीचे चिप्स यांचा साठा आढळला. याशिवाय मैदा, बेसन, वाटाणा पीठ, पामोलिन तेल आणि वापरलेले खाद्यतेलही जप्त करण्यात आले.FDAच्या



माहितीनुसार, कारवाईत २८,९५५ किलो आणि ५६ लिटर खाद्यसाठा ताब्यात घेण्यात आला असून त्याची एकूण किंमत २० लाख ४८ हजार ८०१ रुपये आहे. खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत संशय तसेच उत्पादनस्थळी आढळलेल्या अस्वच्छ परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. तपासणीदरम्यान अनेक धक्कादायक बाबी प्रशासनाच्या निदर्शनास आल्या. काही आस्थापनांकडे आवश्यक वैध अन्न परवाना नसल्याचे आढळले. उत्पादनाच्या ठिकाणी फरशी अस्वच्छ व तेलकट होती. साचलेले तेल आणि खाद्यपदार्थांचे अवशेष परिसरात पडलेले असल्याचेही आढळले.काही ठिकाणी पत्र्यांच्या तात्पुरत्या शेडमध्ये उत्पादन सुरू होते, तर काही भाग उघडा होता. सांडपाण्याचा योग्य निचरा नसल्यामुळे दुर्गंधी निर्माण झाली होती. काही आस्थापनांमध्ये तसेच आजूबाजूच्या परिसरात झुरळे आणि उंदरांचा वावर आढळला. बाहेरील भागात गायी, कुत्रे आणि मांजरींचाही वावर असल्याचे तपासणीत समोर आले. कामगारांकडूनही स्वच्छता नियमांना हरताळ खाद्यपदार्थ तयार करणाऱ्या कामगारांकडून आवश्यक स्वच्छता नियमांचे पालन होत नसल्याचेही आढळले. काही कामगार अप्रोन, हातमोजे आणि टोपीशिवाय काम करत होते. पॅकबंद खाद्यपदार्थांच्या लेबलिंगमध्येही संबंधित नियमांचे पालन न झाल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.या त्रुटींची गंभीर दखल घेत FDAने संबंधित ११ आस्थापनांचे परवाने किंवा नोंदणी निलंबित करून कामकाज थांबविण्याचे आदेश दिले आहेत.मुंबई, पुण्यातही तपासणी मोहीम FDAची कारवाई ठाण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. मुंबईतील विविध खाद्य आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून, स्वच्छता आणि अन्नसुरक्षेतील त्रुटी आढळलेल्या ठिकाणी कारवाई करण्यात आली. पुणे विभागातही काही हॉटेल्स आणि खाद्य आस्थापनांविरोधात कार्यवाही करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील एका ढाब्याच्या फेरतपासणीत पूर्वी निदर्शनास आलेल्या त्रुटी कायम असल्याचे आढळल्याने पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याचे प्रशासनाने सांगितले. सामूहिक अन्नवाटपासाठी सात दिवस आधी सूचना आवश्यक सण, धार्मिक कार्यक्रम, यात्रा, उरूस किंवा अन्य सार्वजनिक कार्यक्रमांत महाप्रसाद, अन्नछत्र, लंगर, भंडारा अथवा सामूहिक अन्नवाटप आयोजित करणाऱ्यांनी अन्नसुरक्षेच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. परवानाधारक किंवा नोंदणीकृत केटरर अथवा स्वयंपाकगृहामार्फत अन्न तयार केले जाणार असल्यास कार्यक्रमाच्या किमान सात दिवस आधी पूर्वसूचना देणे बंधनकारक असल्याचे FDAने स्पष्ट केले आहे. दरम्यान, खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत संशय किंवा अन्नसुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन आढळल्यास नागरिकांनी १८००२२२३६५ या टोल-फ्री क्रमांकावर तक्रार करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई सुरूच राहील, असा इशारा अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.

# भांडुप पोलिसांकडून २१ लाखांचा गुटखा - पानमसाला जप्त; ९ आरोपींना अटक

**मुंबई (विशेष प्रतिनिधी) :** भांडुप पोलिसांनी १२ सप्टेंबरच्या पहाटे ९ जणांना ताब्यात घेत त्यांच्याकडून २० लाख २१ हजार १०० रुपये किंमतीचा गुटखा, पानमसाला आणि वाहने असा तब्बल १ कोटी १८ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे . भांडुप पोलिसांना याबाबत गुप्त माहिती मिळाल्यानंतर हा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित सुपारीच्या वाहतुक व विक्रीच्या माहितीची खातरजमा व कारवाई करण्याकरिता सहाय्यक पोलीस निरिक्षक विनोद लाड व पोलीस पथक त्या ठिकाणी गेले. पहाटे सव्वाचारच्या सुमारास भांडुप येथील पार्किंग व्हिलेज रोड, नाहूर या ठिकाणी सापळा रचून



धाड टाकली. त्याठिकाणी १ कंटेनर, २ टेम्पो, १ बोलेरो, १ पिकअप अशी ५ वाहने आणि ९ इसमांना ताब्यात घेण्यात आले. त्यात वरानसी आशिक सुगंधित सुपारी, सुगंधित तंबाखू अशा एकूण २० लाख २१ हजार १०० रुपये किंमतीचा प्रतिबंधित सुगंधित सुपारीचे पदार्थ व वेगवेगळया कंपनीचे ५ मोटार वाहने (किंमत ९८ लाख) असा एकूण १ कोटी १८ लाख २१ हजार १०० (एक कोटी, अठरा लाख एकविस हजारांचा मुददेमाल ताब्यात घेतला. ही कारवाई पूर्व प्रादेशिक विभागाचे अप्पर पोलीस आयुक्त धनंजय कुलकर्णी तसेच पूर्व परिमंडळ ३ चे पोलीस उपआयुक्त अभयसिंह देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहायक पोलीस आयुक्त अजय जोशी (भांडुप विभाग) यांच्या सूचनेनुसार वरिष्ठ पोलीस निरिक्षक सपना क्षिरसागर यांनी सहाय्यक पोलीस निरिक्षक विनोद लाड, अंमलदार हिरालाल चरांडे, मुकेश तिरमारे, गणेश सोनवणे, विकास शिंदे, विजयकुमार पवार यांनी केली.

# चेंबूरमध्ये २० मांजरांची क्रूर हत्या

## 'कॅट किलर'ला २४ तासांत जामीन मिळाल्याने संताप !

**मुंबई (विशेष प्रतिनिधी) :** मुंबईच्या चेंबूर परिसरात अनेक मांजरींच्या मृत्यू प्रकरणातील अटक करण्यात आलेल्या शिवा नावाच्या आरोपीला न्यायालयाने जामीन मंजूर केल्याने प्राणीप्रेमींमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. आरोपी तुरुंगातून बाहेर आल्यानंतर पुन्हा निष्पाप मुक्या प्राण्यांना लक्ष्य करू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. प्राणी हक्कांसाठी कार्यरत PETA India संस्थेनेही जामीनाच्या निर्णयावर नाराजी व्यक्त करत आरोपीविरोधात कठोर कारवाईची मागणी केली आहे. यासाठी संस्थेचे प्रतिनिधी मुंबई पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत. चेंबूरमधील पांजरापोळ आणि आसपासच्या परिसरात गेल्या काही दिवसांत अनेक मांजरी आणि त्यांची पिल्ले मृत अवस्थेत आढळली होती. काही मृतदेह विद्रूप अवस्थेत सापडल्याने परिसरात संतापाची लाट उसळली होती. सुरुवातीला सहा मांजरी आणि एका पिल्लाचा मृतदेह सापडला होता, तर ऑगस्टपासून आतापर्यंत २० हून अधिक मांजरांचा अशाच प्रकारे मृत्यू झाल्याचा पोलिसांना संशय आहे. या प्रकरणी एका महिला



प्राणीप्रेमीने दिलेल्या तक्रारीनंतर आरसीएफ पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज आणि दोन प्रत्यक्षदर्शींच्या माहितीच्या आधारे ४० वर्षीय शिवा याला अटक करण्यात आली. चौकशीदरम्यान त्याने सहापेक्षा अधिक मांजरींना ठार मारल्याची कबुली दिली असून, मृतदेह पुरलेल्या ठिकाणांची माहितीही पोलिसांना दिली. मांजरी त्रास देत असल्यामुळे त्यांना मारल्याचे त्याने सांगितले. मात्र अटकेनंतर अवघ्याच काही तासांत न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केल्याने तक्रारदार आणि प्राणीप्रेमींमध्ये चिंता वाढली आहे. आरोपी पुन्हा अशा घटना घडवू शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

# ढेबेवाडी परिसरात शेतीपंपांच्या केबलसह लोखंडी साहित्य चोरणारी टोळी पोलिसांच्या जाळ्यात

**सातारा (विशेष प्रतिनिधी) :** ढेबेवाडी आणि परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतीपंपांच्या केबल वायर तसेच बांधकामासाठी लागणारे लोखंडी साहित्य चोरी करणाऱ्या संशयित टोळीचा ढेबेवाडी पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. बाचोली (ता. पाटण) येथील चोरीच्या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी संशयितांचा माग काढत त्यांना ताब्यात घेतले. या कारवाईत चारचाकी वाहन, कॉपर केबल, लोखंडी सळया आणि सेंट्रिंगच्या प्लेटांसह एकूण ३ लाख १ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात सुनील कदम (कदम आवड, मंद्रुळकोळे), क्षितिज उर्फ ओंकार साठे (सणबूर), शुभम गुरव (बाचोली), ओंकार निकम (बामणोली), निखिल थोरात (भोसगाव) आणि पवन गुरव (येलूर, ता. वाळवा) यांची नावे संशयित म्हणून समोर आली आहेत. बाचोली येथे बांधकामासाठी ठेवण्यात आलेले साहित्य चोरीला गेल्याची तक्रार ढेबेवाडी पोलिस ठाण्यात दाखल झाली होती. या तक्रारीनंतर पोलिसांनी तपासाला सुरुवात केली. परिसरातील संशयास्पद हालचाली, वाहनांची माहिती तसेच संबंधित व्यक्तींच्या हालचालींवर पोलिसांनी लक्ष केंद्रित केले. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या



आधारे संशयितांची चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान त्यांनी चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.पोलिसांनी केलेल्या कारवाईत ३२ हजार ४०० रुपये किमतीच्या ५४० किलो लोखंडी सळया, १४ हजार रुपये किमतीच्या सेंट्रिंगच्या १४ लोखंडी प्लेटा, दोन लाख रुपये किमतीचे चारचाकी वाहन आणि ५५ हजार रुपये किमतीची सुमारे ५०० मीटर कॉपर केबल वायर जप्त करण्यात आली. शेतीपंपांच्या केबल चोरीला गेल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसतो. अनेकदा केबल चोरीमुळे पिकांना पाणी देण्याचे कामही खोळंबते. परिसरात अशा घटनांचे प्रमाण वाढल्याने शेतकरी आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे पोलिसांच्या या कारवाईमुळे चोरीच्या घटनांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, अटक केलेल्या संशयितांनी ढेबेवाडी आणि आसपासच्या अन्य भागातही अशाच प्रकारच्या चोऱ्या केल्या आहेत का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. या टोळीमध्ये आणखी काही जणांचा सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात आहे. सहायक पोलिस निरीक्षक डॉ. प्रवीण दाईगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक इंद्रजित चव्हाण, प्रशांत चव्हाण, प्रशांत माने, सौरभ कांबळे, माणिक पाटील आणि संकेत पाटील यांनी कारवाईत सहभाग घेतला. पुढील तपास पोलिस हवालदार धीरजकुमार मुळे करीत आहेत.

# क्रिकेटच्या मैदानानंतर आता जाहिरात विश्वात धुमाकूळ

## ‘इंडिया का कॉम्प्लान बॉय’ म्हणून वैभव सूर्यवंशीची निवड

■ **वृत्तसंस्था :** झायडस वेलनेसच्या न्यूट्रिशन ड्रिंक ब्रँड कॉम्प्लानने भारताचा युवा क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी याची अधिकृत ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करत ‘इंडिया का कॉम्प्लान बॉय’ ही नवी मोहीम सादर केली आहे. या मोहिमेद्वारे मोठी स्वप्ने पाहणाऱ्या मुलांना योग्य पोषण, सातत्यपूर्ण मेहनत, शिस्त आणि कुटुंबाच्या पाठिंब्याच्या जोरावर यश मिळवता येते, हा संदेश देण्यात आला आहे. अनेक दशकांपासून ‘कॉम्प्लान बॉय’ ही संकल्पना देशातील मुलांच्या महत्त्वाकांक्षा आणि त्यांच्या कुटुंबांच्या विश्वासाचे प्रतीक राहिली आहे. बदलत्या काळानुसार या प्रतिमेला नव्या पिढीशी जोडण्यासाठी कंपनीने वैभव सूर्यवंशीची निवड केली आहे. क्रिकेटमधील त्याचा वेगवान प्रवास, कठोर सराव, जिद्द आणि लहान वयात मिळवलेले यश या मोहिमेचा मुख्य आधार ठरले आहे. अवघ्या १५व्या




वर्षी भारतासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करून वैभवने महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचा सर्वात कमी वयात पदार्पण करण्याचा विक्रम मोडला. त्यानंतर त्याने झिम्बाब्वेविरुद्धच्या टी-२० सामन्यात अर्धशतक झळकावत आपल्या प्रतिभेची आणखी एकदा प्रचिती दिली. त्यामुळे आजच्या पिढीतील मेहनत, आत्मविश्वास आणि मोठ्या स्वप्नांचे प्रतीक म्हणून त्याच्याकडे पाहिले जात आहे. कंपनीच्या मते, आजच्या मुलांची स्वप्ने आणि ध्येय बदलली असली तरी त्यामागील मेहनत, सातत्य आणि योग्य पोषणाचे महत्त्व कायम आहे. त्यामुळे वैभवसारख्या तरुण खेळाडूची कहाणी लाखो मुलांना प्रेरणा देणारी ठरेल. या मोहिमेद्वारे कॉम्प्लान नव्या पिढीतील कुटुंबांशी अधिक मजबूत नाते निर्माण करण्याचा प्रयत्न करत असून, मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. या मोहिमेबाबत झायडस वेलनेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पूर्णवेळ संचालक तरुण अरोरा यांनी सांगितले की, ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षांनुसार ब्रँडनेही सतत बदलत राहणे आवश्यक असते. मोठी स्वप्ने पाहणाऱ्या मुलांचा गौरव करण्याची कॉम्प्लानची परंपरा असून, वैभव सूर्यवंशी हा त्याचा सर्वोत्तम प्रतिनिधी आहे. त्याचा प्रवास महत्त्वाकांक्षा, कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण तयारी आणि कुटुंबाच्या पाठिंब्याची प्रेरणादायी कहाणी असल्याचे त्यांनी नमूद केले. ‘थोडा प्लॅन, थोडा कॉम्प्लान’ या संकल्पनेवर आधारित ही मोहीम मोठे यश एका दिवसात मिळत नाही, तर दररोजच्या सराव, योग्य पोषण आणि शिस्तबद्ध जीवनशैलीतून घडते, हा संदेश देते. स्वतः वैभव सूर्यवंशीनेही या मोहिमेबद्दल आनंद व्यक्त करत सांगितले की, आयपीएलमध्ये खेळण्यापासून भारताचे प्रतिनिधित्व करण्यापर्यंतचा प्रवास त्याच्यासाठी अविस्मरणीय आहे. या यशामागे त्याचे कुटुंब, प्रशिक्षक आणि सहकाऱ्यांचा मोठा वाटा असल्याचे त्याने नमूद केले. “आम्ही तिघे भाऊ लहानपणापासून कॉम्प्लान पित मोठे झालो. त्यामुळे ‘इंडिया का कॉम्प्लान बॉय’ बनणे माझ्यासाठी अत्यंत खास क्षण आहे. माझी कहाणी इतर मुलांना मोठी स्वप्ने पाहण्यासाठी, सातत्याने मेहनत करण्यासाठी आणि यश मिळाल्यानंतरही नम्र राहण्यासाठी प्रेरणा देईल, अशी आशा आहे,” असे वैभव म्हणाला. या मोहिमेअंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या डिजिटल चित्रफितीत त्याच्या बालपणापासून आंतरराष्ट्रीय क्रिकेटपर्यंतच्या प्रवासातील महत्त्वाचे टप्पे, कठोर सराव, विक्रम आणि यशाची कहाणी प्रभावीपणे दाखवण्यात आली आहे. मेहनत, योग्य पोषण आणि कुटुंबाच्या पाठिंब्यामुळे कोणतीही स्वप्ने साकार होऊ शकतात, हा या मोहिमेचा मुख्य संदेश असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

# गणेशोत्सवातील महाप्रसादासाठी केटरर्सना एफडीएची पूर्वपरवानगी बंधनकारक

■ **पुणे (अकिल शेख) :** गणेशोत्सवाच्या काळात विविध गणेश मंडळांकडून आयोजित करण्यात येणाऱ्या महाप्रसाद आणि सामूहिक भोजनाच्या कार्यक्रमांसाठी परवानाधारक केटरर्सना आता अन्न व औषध प्रशासनाची (एफडीए) निर्धारित प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. महाप्रसादाची ऑर्डर स्वीकारण्यापूर्वी संबंधित केटरर्सनी एफडीएचा अधिकृत पूर्वनियोजन अर्ज भरून संबंधित झोनच्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे. गणेशोत्सवापुरता मर्यादित नसलेला हा नियम आगामी सण-उत्सवांच्या काळात आयोजित होणाऱ्या महाप्रसाद आणि सामूहिक भोजनाच्या कार्यक्रमांनाही लागू करण्यात आला आहे. मोठ्या संख्येने भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले जात असल्याने अन्नाची गुणवत्ता, स्वच्छता आणि सुरक्षितता राखण्यासाठी ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. कार्यक्रम आयोजित करण्याच्या किमान सात दिवस आधी संबंधित केटरर्सनी एफडीएचा अधिकृत पूर्वनियोजन नमुना भरून संबंधित झोनच्या एफडीए अधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया गणेश मंडळांनी नव्हे, तर अन्न तयार करून त्याचा पुरवठा




करणाऱ्या संबंधित केटरर्सनी पूर्ण करायची आहे. प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच केटरर्सना गणेश मंडळांकडून महाप्रसाद किंवा अन्य सामूहिक भोजनाची ऑर्डर स्वीकारता येणार आहे. पूर्वनियोजन अर्जामध्ये कार्यक्रमाचे ठिकाण, दिनांक, अपेक्षित लाभार्थी संख्या, तयार करण्यात येणारे अन्नपदार्थ आणि आयोजकांची माहिती नमूद करावी लागणार आहे. तसेच केटरर्सचा एफएसएसएआय परवाना क्रमांक व त्याची वैधता, अन्न हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या, त्यांची वैद्यकीय तपासणी, पाण्याचा स्रोत व पाणी तपासणी अहवाल, तसेच प्रमाणित अन्नसुरक्षा पर्यवेक्षकाचे नाव आणि प्रमाणपत्र क्रमांक ही माहितीही सादर करावी लागणार आहे. याशिवाय तयार अन्नाचा नमुना ४८ तास जतन करण्याची व्यवस्था तसेच कच्च्या मालाच्या पुरवठादाराची माहिती प्रशासनाला देणे आवश्यक आहे. त्यामुळे महाप्रसादासाठी केटरर्सची निवड करताना संबंधित केटरर्सने एफडीएची आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली आहे की नाही, याची खात्री करण्याची जबाबदारी मंडळांनीही घ्यावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणावर अन्न तयार करून भाविकांना वितरित केले जात असल्याने अन्नसुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या केटरर्सविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येणार आहे. गणेशोत्सवात महाप्रसाद तयार करणाऱ्या केटरर्सनी Festival.MahaFDA.in या पोर्टलवर पूर्वनियोजन अर्ज भरणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्याकडे अन्नपदार्थ तयार करण्यासाठी आवश्यक परवाना असणे बंधनकारक आहे. प्रक्रिया पूर्ण न करता महाप्रसादाची ऑर्डर स्वीकारल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे.

# ‘आरटीआय’च्या कागदपत्रांचा धाक दाखवत कंपनीकडे ५ कोटींची खंडणी; चौघे जेरबंद

■ **पुणे (विशेष प्रतिनिधी) :** माहिती अधिकारातून कंपनीच्या कामासंदर्भातील कागदपत्रे मिळवल्याचा दावा करून त्यातील त्रुटींचा धाक दाखवत भोसरी एमआयडीसीतील एका कंपनीकडे तब्बल पाच कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी करणाऱ्या ठाण्यातील चौघांना पिंपरी-चिंचवड पोलिसांनी अटक केली. मागील सहा महिन्यांपासून कंपनीच्या प्रतिनिधींवर दबाव टाकून पैसे न दिल्यास कंपनीचे नुकसान करण्यासह संबंधितांना जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. अखेर पोलिसांनी रचलेल्या सापळ्यात २५ लाख रुपयांची रोकड असलेली काळ्या रंगाची बॅग स्वीकारताच चौघांना जेरबंद करण्यात आले. अटक केलेल्यांची नावे राहुल प्रेमनारायण मिश्रा (वय ३८), अल्ताफ उस्मान जानवेकर (वय ५३), रमेश भर्मा मांजरेकर (वय ३९) आणि सुनील राजेंद्र कानू (वय ३५, सर्व रा. ठाणे) अशी आहेत. कंपनीच्या प्रतिनिधीने दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादी यांची भोसरी एमआयडीसीमध्ये कंपनी आहे. मागील सहा महिन्यांपासून आरोपी कंपनीच्या प्रतिनिधींशी संपर्क साधत होते. माहिती अधिकारातून कंपनीच्या कामासंदर्भातील कागदपत्रे मिळवल्याचे सांगून त्यांनी कामात त्रुटी असल्याचा




दावा केला. त्याआधारे कंपनीच्या कामावर कारवाई घडवून आणण्याची भीती दाखवत सुरुवातीला पैसे आणि हप्त्याची मागणी करण्यात आली. त्यानंतर, ‘महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल तर पाच कोटी रुपये द्यावे लागतील,’ अशी मागणी करण्यात आली. पैसे न दिल्यास कंपनीचे नुकसान करण्यासह कंपनीशी संबंधित व्यक्तींना जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. आरोपींनी ई-मेलच्या माध्यमातूनही धमक्या दिल्या. फिर्यादीने संबंधित ई-मेल, संभाषणांचे रेकॉर्डिंग आणि सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना दिले आहेत. व्यावसायिक आणि उद्योजकांना धमकावून खंडणी उकळण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याच्या सूचना पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी गुन्हे शाखेला दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर संबंधित व्यावसायिकाने ठाण्यातील काही जण खंडणीसाठी त्रास देत असल्याची माहिती आयुक्त चौबे यांच्यापर्यंत पोहोचवली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी पोलिस उपायुक्त (गुन्हे) रोहिदास पवार यांना तत्काळ कारवाईच्या सूचना दिल्या. त्यानंतर खंडणीविरोधी पथकाचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या पथकाने सापळा रचला.

> **“औद्योगिक परिसरातील उद्योजक, व्यावसायिक तसेच विविध आस्थापनांना धमकावणे, दबाव निर्माण करून पैशांची मागणी करणे किंवा गुन्हेगारी टोळ्यांच्या माध्यमातून खंडणी वसूल करण्याचा प्रयत्न कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. अशा तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. औद्योगिक विकासाला बाधा आणणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तींविरोधात पिंपरी-चिंचवड पोलिसांचे ‘झिरो टॉलरन्स’ धोरण कायम राहील.”**
>
> — रोहिदास पवार, पोलिस उपायुक्त (गुन्हे), पिंपरी-चिंचवड

# गणेशोत्सवात ७०१ सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई

■ **पुणे (विशेष प्रतिनिधी) :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पुणे पोलिसांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाईचा धडाका सुरू केला आहे. परिमंडळ दोनच्या हद्दीतील सात पोलिस ठाण्यांच्या अभिलेखावरील ७०१ सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. गणेशोत्सवाच्या कालावधीत संबंधित पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात प्रवेश करणे, वास्तव्य करणे, तसेच सार्वजनिक गणेशोत्सव, मिरवणुका आणि अन्य सार्वजनिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास त्यांना मनाई करण्यात आली आहे.गणेशोत्सवात शहरातील प्रमुख रस्ते, चौक, मंडई परिसर, गणेश मंडळांच्या परिसरासह विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर मोठ्या प्रमाणात गर्दी होते. मिरवणुका आणि देखावे पाहण्यासाठी येणारे नागरिक, भाविकांची गर्दी तसेच विविध कार्यक्रमांमुळे वाहतूकही मोठ्या प्रमाणात वर्दळीची होते. या गर्दीचा गैरफायदा घेऊन अनुचित प्रकार घडू नयेत आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींमुळे कायदा



व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांनी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर दिला आहे. बेकायदा शस्त्रांचा वापर, मारहाण, दुखापत, गंभीर दुखापत, धमकी, मालमत्तेचे नुकसान, चोरी, दंगल, दरोड्याची तयारी, जबरी चोरी तसेच नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये अभिलेखावर असलेल्या व्यक्तींचा या कारवाईत समावेश आहे. परिमंडळ दोनमध्ये स्वारगेट, सहकारनगर, पर्वती, मार्केट यार्ड, बिबवेवाडी, भारती विद्यापीठ आणि आंबेगाव या सात पोलिस ठाण्यांचा समावेश आहे. या पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींची माहिती संकलित करून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार आणि पोलिस सहआयुक्त संजय दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पर्वती पोलिस ठाण्याच्या हद्दीत सर्वाधिक ११५ जणांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्यापाठोपाठ बिबवेवाडी आणि भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत प्रत्येकी १०४, सहकारनगर आणि आंबेगाव येथे प्रत्येकी १०१, स्वारगेट येथे १००, तर मार्केट यार्ड पोलिस ठाण्याच्या हद्दीत ७६ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. गणेशोत्सवाच्या काळात शहरातील प्रमुख गणेश मंडळे, गर्दीची ठिकाणे, मिरवणूक मार्ग, चौक आणि संवेदनशील भागांवर पोलिसांचे विशेष लक्ष राहणार आहे. गर्दीत संशयास्पद हालचाली करणाऱ्या व्यक्तींवर नजर ठेवण्याबरोबरच गुन्हेगारी अभिलेखावरील व्यक्तींकडून कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी स्थानिक पोलिसांकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू ठेवण्यात येणार आहेत.

# निर्माल्यापासून खतनिर्मिती

## वसई-विरार पालिकेचा पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा उपक्रम

■ **विरार (सुचिता देशमुख) :** गेल्या तीन वर्षांपासून निर्माल्यापासून खतनिर्मितीचा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर वसई-विरार महापालिकेने यंदाही गणेशोत्सवात निर्माल्यापासून खतनिर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे. गणेशोत्सवादरम्यान निर्माण होणारे निर्माल्य एकत्रितपणे संकलित करून महिला बचत गटांच्या सहकार्याने त्याचे वर्गीकरण आणि प्रक्रिया करण्यात येणार आहे. गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यावर महापालिकेने भर दिला आहे. कृत्रिम तलाव आणि मूर्तिदानाच्या संकल्पनेनंतर आता गणेशोत्सवात पूजेसाठी वापरण्यात येणाऱ्या हार-फुलांचे निर्माल्य संकलित करून त्यापासून खतनिर्मिती करण्यात येणार आहे. गणेशमूर्ती विसर्जनाच्या वेळी शहरात मोठ्या प्रमाणात हार-फुले, केळीचे खांब आणि अन्य पूजा साहित्याचे निर्माल्य तयार होते. हे निर्माल्य नागरिक तलाव, समुद्र, नदी आणि खाड्यांमध्ये टाकून देतात. अनेकदा निर्माल्यासोबत प्लास्टिकच्या



पिशव्या आणि अन्य साहित्यही पाण्यात टाकले जाते. पाण्यात कुजणाऱ्या या निर्माल्यामुळे जलप्रदूषण होते, तसेच त्याचा परिणाम जैवविविधतेवरही होतो. त्यामुळे निर्माल्याची योग्य आणि शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी गणेशोत्सवादरम्यान निर्माण होणारे निर्माल्य एकत्रितपणे संकलित करण्यात येणार आहे. संकलित केलेल्या निर्माल्याचे हार-फुले, त्यातील दोरे, अन्य पूजा साहित्य आणि प्लास्टिक असे वर्गीकरण केले जाणार आहे. शहरात १२८ ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या कृत्रिम तलावांवर निर्माल्य कलश ठेवण्यात येणार आहेत, अशी माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सहायक आयुक्त जितेंद्र नाईक यांनी दिली. नागरिकांनी गणेशोत्सवादरम्यान तयार होणारे निर्माल्य पाण्यात न टाकता थेट निर्माल्य कलशात टाकावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे. मागील वर्षी गणेशोत्सवादरम्यान तब्बल ९ हजार ८५० किलो निर्माल्य संकलित करण्यात आले होते. त्यापासून खतनिर्मिती करण्यात आली होती. यंदाही त्याच पद्धतीने निर्माल्यावर प्रक्रिया करून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला चालना देण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.

# ‘एआय’च्या मदतीने महावितरणचा वीजचोरांना दणका; तीन महिन्यांत २७,९६४ वीजचोऱ्या उघड

■ **पुणे (विशेष प्रतिनिधी) :** राज्यात वीजचोरीविरोधात महावितरणने राबविलेल्या धडक मोहिमेत गेल्या तीन महिन्यांत २७ हजार ९६४ वीजचोऱ्या उघडकीस आल्या आहेत. त्यापैकी २४ हजार ५०८ प्रकरणांच्या मूल्यांकनातून तब्बल ६६ कोटी २८ लाख रुपयांची वीजचोरी झाल्याचे स्पष्ट झाले आहे. आतापर्यंत १० हजार ८१० वीजचोरांनी २९ कोटी ८५ लाख रुपये भरले असून, दंडाची रक्कम न भरणाऱ्या २८९ वीजचोरांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वीजचोरीचे प्रकार शोधण्यासाठी महावितरणने कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित मॉडेल विकसित केले आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीने वीजग्राहकांचा आणि संबंधित परिसरातील वीजवापराचा जुना आलेख, अचानक वाढलेली किंवा घटलेली मागणी, मीटरमधील तांत्रिक फेरफार यांसह ५० हून अधिक तांत्रिक निकषांचे २४ तास सूक्ष्म विश्लेषण केले जाते. वीजवापरामध्ये शंकास्पद फरक आढळल्यास संबंधित ग्राहकांना ‘हाय-रिस्क’ श्रेणीत टाकले जाते. त्यामुळे प्रत्यक्ष तपासणीपूर्वीच वीजचोरीची शक्यता असलेल्या ठिकाणांची माहिती उपलब्ध होत असल्याचे महावितरणने सांगितले आहे. विजेच्या तारांवर थेट आकडा टाकणे किंवा मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी करणाऱ्यांवरही तपासणीदरम्यान कारवाई केली जाते. राज्यात वीजचोरांवर कारवाईसाठी १९० हून अधिक विशेष भरारी पथके कार्यरत आहेत. वीजजोडणीच्या तपासणीपासून वीज देयकाच्या आकारणीपर्यंतची प्रक्रिया ‘थेफ्ट ट्रॅकिंग अँड मॉनिटरिंग सिस्टीम’द्वारे ऑनलाइन करण्यात आली आहे. यासाठी स्वतंत्र मोबाईल ॲपही विकसित करण्यात आले आहे. वीजचोरीचे ठिकाण, तपासणीचे छायाचित्र, डिजिटल पंचनामा, जागेवरच वीजपुरवठा खंडित करणे, दंडात्मक देयकांची वसुली आदी माहिती ॲपवर रिअल-टाइम अपडेट केली जाते. त्यामुळे कारवाईत पारदर्शकता आणि वेग आल्याचा दावा महावितरणने केला आहे. येत्या तीन वर्षांत महावितरणची तांत्रिक व वाणिज्यिक हानी १० टक्क्यांपेक्षा कमी करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी वीज देयकांच्या थकबाकी वसुलीला प्राधान्य देण्यात येत आहे. वीजचोरीचे प्रकार उघड करण्यासाठी विकसित केलेल्या ‘एआय’ मॉडेलमुळे वीजचोरीविरोधातील कारवाई अधिक तीव्र आणि अचूक होत असल्याचे महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले.

# मनपा उपहारगृहांमध्ये मिळणार स्वच्छ अन्नाची शाश्वती

## स्वच्छ आणि सुरक्षित अन्नासाठी विशेष समिती स्थापन

■ **मुंबई (विशाल कारंडे) :** मुंबई महानगरपालिका मुख्यालयासह सर्व विभाग कार्यालये आणि रुग्णालयांमधील उपहारगृहांमध्ये स्वच्छ व सुरक्षित अन्नपदार्थ मिळावेत, यासाठी पालिका प्रशासनाने खबरदारीच्या उपाययोजना सुरू केल्या आहेत. प्रत्येक विभाग कार्यालयातील चार वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती नियुक्त करून उपहारगृहांवर देखरेख ठेवण्यात येणार असून, एकूण १०० अधिकाऱ्यांची नियुक्ती प्रस्तावित आहे. याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाने तयार करून




महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्याकडे सादर केला आहे. महापालिका मुख्यालयातील उपहारगृहात अस्वच्छता तसेच ताकामध्ये माशी आढळल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) त्या उपहारगृहाचा परवाना निलंबित केला होता. परिणामी ते महिनाभर बंद राहिले. त्यामुळे पालिका कर्मचारी, बंदोबस्तावरील पोलीस आणि अभ्यागतांची खाण्या-पिण्याची गैरसोय झाली होती. पुन्हा अशी परिस्थिती उद्भवू नये, यासाठी ही समिती नियुक्त केली जाणार आहे. एफडीएकडून प्रशिक्षण देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांकडून अन्न सुरक्षा व मानके अधिनियमाच्या पालनावर देखरेख ठेवली जाईल. यात आस्थापना, परिसर व सुविधा; उपकरणे व भांडी; कच्चा माल व पुरवठा नियंत्रण; साठवण व तापमान नियंत्रण; पाणी, बर्फ व वाफ; वैयक्तिक स्वच्छता, आरोग्य व प्रशिक्षण; कीटक नियंत्रण; स्वच्छता व निर्जंतुकीकरण; कचरा व्यवस्थापन; उत्पादन माहिती व ग्राहक जागरूकता; तसेच अन्न सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली व नोंदी या बाबींचा समावेश असेल. समितीत यांचा समावेश : परिरक्षण खात्यातील प्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी तसेच इतर विभागांतील प्रतिनिधी यांचा समितीत समावेश असेल. उपहारगृहातील स्वच्छता, सुरक्षा, किचन, कामगार आणि खाद्यपदार्थांचे दर यासह अन्य बाबींवरही समिती देखरेख ठेवणार आहे.